# सारस्वत चैतन्य

वर्ष : ३८ । अंक : ४ । मुंबई । जानेवारी–मार्च २०२४ । एकूण अंक क्र. : १५२ । पाने : ६० । किंमत २० रुपये
Year : 38 | Issue : 4 | Mumbai | January-March 2024 | Total Issue no. : 152 | Pages : 60 | Price 20 Rupees



**ज्येष्ठ मराठी चित्रपट आणि नाट्य अभिनेते अशोक सराफ**

**महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित!**



भारतातील आणि परदेशातील
शिक्षणासाठी
विद्यार्थी अनुकूल
शैक्षणिक
कर्ज
9.00 % p.a.
( विद्यार्थिनींसाठी )
9.25 % p.a.
( सामान्य )
*अटी व नियम लागू
For Premier Institute - IIT , IIM ,IISC & ISB - व्याजदरात 0.25% सवलत.
मोरॅटॉरियम सुविधा उपलब्ध
प्री-पेमेन्ट शुल्क नाही
www.nkgsb-bank.com
SINCE 1917
NKGSB Co-operative Bank Ltd. (Multi-State Scheduled Bank)
कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी तुमच्या जवळच्या शाखेस भेट द्या
किंवा 022 28602020 वर मिस्ड कॉल द्या.

# सारस्वत ब्राह्मण समाज

(स्थापना गुढीपाडवा १८९६)

(सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र. ई-२२१४८ मुंबई)

मधुकोष, पहिला मजला, शं. वि. सोवनी पथ,
गिरगाव, मुंबई-४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८६२२६९
Email : saraswatbrahmansamaj@gmail.com

## संस्थेचे उपक्रम

सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते १२ शिशुमंदिर

सोमवार ते शनिवार, दुपारी १२ ते ४ फॅशन डिझायनिंग

सायंकाळी ६ ते ८.३० वाचनालय

सायंकाळी ६ ते ८.३० वधूवर सूचक मंडळ

सोमवार, बुधवार व शनिवार सायंकाळी ५.३० ते ९ बॉलीवूड नृत्यकलेचे वर्ग.

मंगळवार व गुरुवार ५.३० ते ९ कथ्थक नृत्यकलेचे वर्ग

दुपारी ४ ते ५.३० योगविद्या

दर बुधवारी रात्री ९.३० ते १०.३० उपासना



उत्सव निसर्गाचा,
श्वास सुखाचा
गोव्यातील सुखसमृद्धीला,
वरदहस्त मंगेशाचा!
देखणा निसर्ग
प्रदूषणमुक्त हवा
उत्कृष्ट बांधकाम
मुबलक पाणी
मंगेशीचा मंगेश,
मारदोळची म्हाळसा,
वेलिंगचा नृसिंह,
मडकईची नवदुर्गा
अशा अतिशय प्रसिद्ध
मंदिरांच्या सान्निध्याने
पवित्र झालेला परिसर
सुखसमृद्धी
मंगेशीच्या देवळापासून दोन मिनिटांच्या अंतरावर
मंगेशी, फोंडा - गोवा
फ्लॅट्स उपलब्ध :
१ रूम किचन,
१ बी.एच.के.,
२ बी.एच.के.
प्रोजेक्ट मान्यता :
गोवा टाउन प्लॅनिंग
कर्ज सहाय्य :
नामवंत वित्त संस्था
A project by:
KCC
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
संपर्क : मुंबई - कल्पना केरकर : 9820933352 • जितेंद्र वैती : 9833636451
Airtel Landline +91 22 40153980 • Email : kunalconstructiongoa@yahoo.in • Web : www.kccgoa.in
गोवा - नरेश केरकर : 9422639188 • के. विनोद : 9975975782, 8698269174

श्रद्धाच तुझी कवळील विश्वबंधुत्व

# सारस्वत चैतन्य

वर्ष : ३८ । अंक : ४ । जानेवारी–मार्च २०२४ । एकूण अंक क्र. : १५२

Year : 38 | Issue : 4| January-March 2024 | Total Issue no. : 152



**कै. प्रफुल्लदत्त**
संस्थापक–संपादक
(१९८६–१९८७)



**कै. रवींद्र पाटकर**
संपादक
(१९८७–२०१०)

**संपादक :**

सुधाकर लोटलीकर

**विश्वस्त मंडळ**

**अध्यक्ष :**
दिलीप भिसे

**कार्याध्यक्ष :**
राजेंद्र देसाई

**कार्यवाह :**
राहुल साखळकर

**संयुक्त कार्यवाह :**
प्रसाद कुलकर्णी

**कोषाध्यक्ष :**
दीपक मुळ्ये

**विश्वस्त :**
प्रमोद तेंडुलकर । सुधाकर लोटलीकर
नीलेश रांगणेकर । मयुरेश पाडगांवकर

www.saraswatprakashan.org
Email : Chaitanyamag@gmail.com

**देणगी**

हितचिंतक : ३,५००/–
आश्रयदाता : ६,०००/– । आधारस्तंभ : १०,०००/–
(अधिक माहितीसाठी अंकातील निवेदन पाहावे.)
**देणगीदार, जाहिरातदारांना विनामूल्य अंक**

**: पत्रव्यवहाराचा पत्ता :**
सारस्वत प्रकाशन, सारस्वत भवन, दुसरा मजला, खोली नं. १०,
छत्रपती शिवाजी महाराज पथ (मोगल लेन), माहीम (पश्चिम),
मुंबई – ४०० ०१६
संपर्क : सोमवार ते शनिवार, सायंकाळी ५ ते ७ (मो. ८७७९७५८०८५)

**– या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही –**

# आधारस्तंभ

**व्यक्ती**

- श्री. रघुवीर सीताराम मंत्री
- श्री. प्रकाश दामोदर कामत
- डॉ. प्रेमानंद भि. पै-धुंगट
- श्री. मंगेश रंगनाथ भांडारकर
- श्री. हेमंत शरद पै
- श्री. सुबोध आर. नेमळेकर
- श्रीमती स्नेहलता कुळकर्णी
- सौ. अरुंधती अ. किनरे
- डॉ. गुरुकुमार भालचंद्र परुळकर
- डॉ. प्रेमानंद शांताराम रामाणी
- सौ. प्रतिमा प्रेमानंद रामाणी
- श्री. नाथ रामानंद लाड
- श्री. शशिकांत गोविंद तोरणे
- श्री. अजित एन. गुंजीकर
- श्रीमती उर्मिला उमेश कोचरेकर
- श्री. श्रीकांत नरहरी वागळे
- श्री. सुरेश यशवंत कावतकर
- श्री. सुरेश बोरकर
- श्री. केशव गुरुनाथ शेटे
- श्री. मोरेश्वर महादेव सबनीस
- डॉ. शरदचंद्र एस. गायतोंडे
- श्रीमती सीमा लक्ष्मीकांत नेरुरकर
- श्री. रमेश भट
- श्री. किशोर गुरुदास मासुरकर
- श्री. श्याम शंकर कुळकर्णी
- श्री. भालचंद्र महादेव उर्फ दीपक पिंगे
- श्री. अजित सत्येंद्रनाथ रेगे
- ॲड. समीर मनोहर तेंडुलकर
- डॉ. वामन शांताराम खटकूळ
- श्री. कृष्णा गजानन तेंडुलकर
- सौ. क्षमा श्रीराम पालेकर
- श्री. अमित अनिल पंडित
- श्री. विश्वास गजानन तेंडुलकर
- श्री. भालचंद्र प्रभाकर जुवळे
- डॉ. हेमंत मधुकर हळदवणेकर
- डॉ. अनुराधा प्रकाश सामंत
- श्री. शशिकांत केशव साखळकर

- श्री पुरुषोत्तम एस. साखळकर
- श्री. केतन यशवंत कामत
- ॲड. प्रसाद ज्ञानेश्वर बोरकर
- श्री. राजेंद्र बाळकृष्ण देसाई
- सौ. विजयालक्ष्मी विष्णू कर्नाटकी
- श्री. गुरुप्रसाद व्ही. सामंत
- श्री. राजेश मेघश्याम नाडकर्णी
- श्री. दीपक भास्कर पंडित
- डॉ. उल्हास रामचंद्र तेंडुलकर
- श्री. सुहास बी. पोतकर
- श्री. सुभाष लक्ष्मण सराफ
- श्री. सुबोध श्रीकांत हरमळकर (संझगिरी)
- सौ. नेत्रा श्रीपाद वैद्य
- श्री. मोहित माणिक भेंडे
- सौ. प्रतिभा विश्वास तेंडुलकर
- श्रीमती अनुराधा अनिल तेंडुलकर
- श्री. राजेंद्र विनायक शिरगावकर
- श्री. अवधूत सी. सुखटणकर
- सौ. शुभांगी अ. सुखटणकर
- श्री. प्रसन्नराज शांताकुमार भांडारकर
- श्री. नागेश पिंगे
- श्री. अवधूत सदाशिव कोटणीस
- श्री. श्रीकांत सदाशिव सिनकर
- श्री. जगन्नाथ मनमोहन प्रभुदेसाई
- श्री. डॉ. श्रीरंग दामोदर बिच्चू
- श्रीमती विजया तेलंग
- श्री. दत्तप्रसाद मनोहर दळवी
- श्री. विकास शंकर तेंडुलकर
- श्री. अद्वैत नीलेश हुन्सवाडकर
- श्री. त्रिंबक मंगेश नाडकर्णी

## कुटुंबीय

- कै. नारायण झांट्ये यांचे कुटुंबीय
- कै. सौ. गीता गोपाळ पालेकर यांचे कुटुंबीय
- कै. डॉ. प्रभाकर वामन रेगे व कै. सौ. प्रमोदिनी प्रभाकर रेगे यांचे कुटुंबीय
- कै. नीला व रामकृष्ण अनंत सबनीस यांचे कुटुंबीय
- कै. व्ही. डी. पाडगावकर आणि पत्नी श्रीमती आशा
- कै. सौ. निर्मला गोविंद वाडेकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. सुलभा व कै. श्री. चंद्रकांत गणेश सुखटणकर यांचे कुटुंबीय
- स्ट्रक्टवेल डिझायनर्स अँड कन्सल्टंट्स संस्था मर्यादित (कै. रमेशचंद्र नारायण रायकर यांच्या स्मरणार्थ)
- प्रमिला दत्ताराम तेंडुलकर (वडील कै. डॉ. सगुण राघोबा रेगे यांच्या स्मरणार्थ)
- कै. श्रीमती साधना धुंडीराज वाकडे यांचे कुटुंबीय
- डॉ. राजीव गुरुनाथ रेडकर (आजोबा कै. आत्माराम श्रीधर रेडकर व आजी कै. नलिनी आत्माराम रेडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ)
- कै. भास्करराव मोरेश्वर कामत यांचे कुटुंबीय
- डॉ. प्रभाकर नारायण कामत (कै. श्री. नारायण विश्वनाथ कामत व श्रीमती इंदिरा नारायण कामत यांच्या स्मरणार्थ)
- श्री. गजानन नारायण डांगी आणि कुटुंबीय
- श्रीमती वैशाली साखळकर (कै. श्रीनिवास भा. साखळकर यांचे स्मरणार्थ)
- कै. श्री. प्रभाकर शामराव कामत व कै. श्रीमती ललिता प्रभाकर कामत यांच्या स्मरणार्थ
- उर्मिला मधुकर चिटणीस (कै. श्री. मधुकर शंकर चिटणीस आणि सौ. गिरिजा मधुकर चिटणीस)
- सौ. अनुराधा उल्हास तेंडुलकर, पूर्वाश्रमीच्या कुमारी कुंदबाला मधुकर हेर्लेकर (वडील कै. मधुकर मोतीराम हेर्लेकर यांच्या स्मरणार्थ
- क्षमा एस. पालेकर (श्रीराम गजानन पालेकर यांच्या स्मरणार्थ)
- वामन मंगेश नाडकर्णी (कै. मंगेश विनायक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ)
- अनिरुद्ध नारायण पंत वालावलकर
- डॉ. उल्हास रामचंद्र तेंडुलकर (कै. रामचंद्र यशवंत तेंडुलकर व कै. सुधा रामचंद्र तेंडुलकर यांच्या स्मरणार्थ)
- सौ. धनश्री सुबोध नेमळेकर (कै. कवी द. वि. तेंडुलकर उर्फ प्रफुल्लदत्त  यांच्या स्मरणार्थ)
- श्रीमती सुनीता रमाकांत कुलकर्णी (कै. श्री. रमाकांत शिवराम कुलकर्णी [मसुरेकर] यांच्या स्मरणार्थ)

## संस्था

- सारस्वत हितवर्धक मंडळ, माहीम, मुंबई
- सारस्वत ब्राह्मण समाज, गिरगाव, मुंबई

# आश्रयदाते

**व्यक्ती**

- डॉ. राजेंद्र वाय. आंगले
- डॉ. प्रताप बा. मुळगांवकर
- श्री. गुरुनाथ शं. साखळकर
- श्री. शशिकांत ए. तेंडुलकर
- श्री. श्रीधर वामनराव सांखोळकर
- श्रीमती सुरेखा केशव पंडित
- श्रीमती कुमुदिनी इ. नाईक
- श्री. मुकुंद कृष्णाजी सबनीस
- सौ. मीरा व श्री. सीताराम लाड
- श्री. प्रमोद रघुनाथ वकील (नाईक)
- श्री. मोहनदास शानभाग
- श्री. प्रशांत वि. कामत
- डॉ. वामन चिं. पालेकर
- श्री. मिलिंद दिगंबर वरेरकर
- श्री. आत्माराम शांताराम पुनाळेकर
- श्री. भालचंद्र गंगाधर वाकडे
- श्री. व सौ. अनुराधा श्रीकृष्ण दळवी
- श्री. अरविंद यशवंत सबनीस
- सौ. सविता कमलाकर देसाई
- श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण दळवी
- श्री. विनायक कुळकर्णी
- श्री. माधव वसंत देशपांडे
- श्री राजाराम मंगेश सिनकर
- श्री. मोहन रामचंद्र देशपांडे
- सौ. सुनीला एम. रेगे
- श्रीमती रोहिणी कमलनाथ दिवाडकर
- श्री. विश्वनाथ आर. नेरूरकर
- डॉ. विवेक सुधाकर हळदवणेकर
- श्री. शशिधर यशवंत राजाध्यक्ष
- श्री. दामोदर मर्तू नायक
- डॉ. सुरेश वासुदेव दणाईत
- श्री. रमाकांत पां. लोटलीकर
- श्री. दिनकर जयवंत मंत्री
- कु. अनघा प्रणव तेंडुलकर
- डॉ. कल्पा अरविंद पंडित
- श्री. मनीष किशोर वाकडे
- डॉ. संजय लोटलीकर
- श्री. शैलेश लक्ष्मीकांत नेरुरकर
- श्री. संदेश सुरेश सरदार
- श्री. संजीव रामचंद्र तेंडुलकर
- श्री. रवींद्र कृष्णाजी कामत
- सौ. मंगल रमाकांत तेंडुलकर
- श्री. अशोक जनार्दन सिनकर
- अॅड. यशवंत जगन्नाथ कावतकर
- श्री. दिलीप सुंदरराव परुळकर
- श्रीमती निर्मला एन. खानोलकर
- श्री. सुधाकर अच्युत राजाध्यक्ष
- श्री. रमेशचंद्र रघुनाथ तेंडुलकर
- श्रीमती ऋजुता राजन तेरगावकर
- डॉ. करिश्मा प्रसाद बांदिवडेकर
- सौ. राधिका रामदास पत्की
- श्री. कल्याण वर्दे
- श्री. मोरेश्वर एम. वायंगणकर
- श्रीमती माधवी परेश घोलकर
- श्री. उमेश मे. भांगले

- श्री. मंगेश (राजा) दत्तात्रय हळदवणेकर
- श्री. प्रमोद विनायक कामत
- ॲड. देवदत्त अजित साखळकर
- श्री. प्रसन्न मदन सिनकर
- श्री. मंगेश श्रीधर कामत
- श्री. सुचित सुधीर कावतकर
- श्री. दीपक यज्ञेश्वर मुळ्ये
- श्री. आनंद घुर्ये
- श्री. श्रीकांत श्रीराम तेंडुलकर
- श्री. गिरीश ज. महाडदळकर
- श्रीमती पुष्पलता माधव कोटणीस
- श्री. मधुकर हरी नारुरकर
- श्री. विवेक म. लोटलीकर
- श्री. दत्ताराम गोविंद कैसरे
- श्री. रमेश विठ्ठल कामत
- डॉ. यशस्विनी रजनीकांत जनवाडकर
- श्री. सिद्धार्थ लाटकर
- श्री. वामन सुभ्भा प्रभू
- सौ. पूर्णा उदय प्रभू पाटकर
- श्री. भास्कर के. दळवी
- श्री. अशोक केसरीनाथ नाडकर्णी
- श्री. एम. एन. कंटक
- श्री. चंद्रकांत विनायक देसाई
- डॉ. अरविंद दत्ताराम मांजरेकर
- सौ. श्रद्धा आशुतोष कुळकर्णी
- श्री. प्रताप विष्णू तेंडुलकर
- श्री. राजेश चंद्रकांत आजगावकर
- श्री. आनंद प्रभाकर महाजन
- श्री. शैलेश जगन्नाथ तेंडोलकर (वर्दे)
- सौ. रेखा सचिन कुंकळ्ळीकर
- कु. पृथा सचिन कुंकळ्ळीकर
- श्री. विठ्ठलदास पुंडलिक भट

## कुटुंबीय

- कै. डॉ. द्वारकानाथ वि. पंडित यांचे कुटुंबीय
- कै. व्ही. एन. व. कै. डब्ल्यू. एस. परुळकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. आशालता चंद्रकांत सिनकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. काशीबाई ऊर्फ मीना नारायण राजाध्यक्ष यांचे कुटुंबीय
- कै. श्रीमती सुमन मधुकर देसाई यांचे कुटुंबीय
- कै. विश्वनाथ वामन नाडकर्णी व
  कै. सौ. अन्नपूर्णा वि. नाडकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. एन. जी. कामत यांचे कुटुंबीय
- कै. एकनाथ व्यंकाजी रांगणेकर आणि
  पत्नी श्रीमती सुनीता
- कै. सौ. केतकी सुरेंद्र मंत्री यांचे कुटुंबीय
- कै. रमाकांत शेषगिरीराव कुळकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. सौ. रमाबाई व वासुदेव रामचंद्र नाडकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. गोपाळकृष्ण द्वारकानाथ गावसकर व
  कै. सौ. नीला गो. गावसकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. सुनंदा (छबी) राजाराम कबे यांचे कुटुंबीय
- कै. श्री. गिरीश शंकर गोठिवरेकर कुटुंबीय
- सौ. उज्ज्वला व श्री. रत्नाकर रामकृष्ण वागळे आणि कुटुंबीय
- श्री. विनोद मधुकर गुळगुळे (पत्नी कै. सौ. विनिता (शैला) विनोद गुळगुळे हिच्या स्मरणार्थ)
- श्री. भालचंद्र सुभाष कामत
  (बंधू कै. विनायक सुभाष कामत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ)
- श्री. गिरीश चंद्रकांत कळसूलकर (कै. सुनंदा व कै. बाळकृष्ण महादेव कळसूलकर यांच्या स्मरणार्थ)
- श्री. विनायक गोविंद कामत
  (कै. गोविंद आनंदराव कामत यांच्या स्मरणार्थ)
- श्री. सुब्राय अच्युत गायतोंडे आणि कुटुंबीय
- श्री. भालचंद्र सुभाष कामत
  (कै. विनायक कामत यांच्या स्मरणार्थ)
- डॉ. मृणाल आणि डॉ. रघुनंदन गोविंद केंकरे तोरसेकर
- विवेक बाळकृष्ण तिनईकर
  (कै. अविनाश बाळकृष्ण तिनईकर यांच्या स्मरणार्थ)
- एन. एस. पै ॲण्ड सन्स, बेळगाव
- शैलेश शरद पोतदार आणि कुटुंबीय

## संस्था

- सारस्वत दीनवत्सल संघ, गिरगाव, मुंबई
- बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण निधी, दादर, मुंबई

# अंतरंग

संपादकीय / ११
चिंतनिका / १२

**दिवाळी अंक कथा स्पर्धा २०२३ - दुसऱ्या क्रमांकाची कथा**
अनोखी सावली : राजस रेगे / १३
**दिवाळी अंक कथा स्पर्धा २०२३ - तिसऱ्या क्रमांकाची कथा**
लाल मफलर : शैलजा कामत / १८

**दिवाळी अंक काव्य स्पर्धा २०२३ / २१**
प्रथम क्रमांकाची कविता - डॉ. सतीश कानविंदे
द्वितीय क्रमांकाची कविता - शैलेश पोतदार

सारस्वत चैतन्य गौरव सोहळा २०२३ / २२
सारस्वत चैतन्य गौरव सोहळा २०२३ मधील पाहुणे आणि
पुरस्कारार्थींचा थोडक्यात परिचय / २५
सारस्वत हितवर्धक मंडळाचा दिमाखदार शतकमहोत्सवी पदार्पण सोहळा संपन्न / ३२
सारस्वत हितवर्धक मंडळ शतकमहोत्सव कार्यक्रम मालिका / ३४
सारस्वत हितवर्धक मंडळ आयोजित मोफत चष्मे वाटप व वैद्यकीय शिबिर संपन्न / ३६
सारस्वत चेंबरचे गोवा येथे 'कन्स्ट्रक्शन आणि रिअल इस्टेट समिट' चे आयोजन / ३८
सारस्वत बोर्डिंगकडून विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग / ४०
सारस्वत महिला मंडळ आयोजित कुंकूमार्चन सोहळा / ४२
गौरवगाथा / ४४
ज्येष्ठ पत्रकार विजय साखळकर यांची
मनाला चटका लावणारी एक्झिट - प्रमोद तेंडुलकर / ५२
कर्म आणि चारित्र्य / ५३


**संपादकीय । सुधाकर लोटलीकर**



# एका व्रतस्थाचे निधन

'व्रतस्थ' हा शब्द आजकाल दुर्मिळ झाला आहे. गोव्याचे रामकृष्ण नायक या अशा दुर्मिळ प्रजातीतले होते.

काही काही व्यक्ती आपले संपूर्ण आयुष्य समाजकार्यासाठी वाहून घेतात. समाजाची सेवा हाच त्यांचा ध्यास आणि श्वास असतो. असेच एक व्रतस्थ व्यक्तिमत्त्व म्हणजे आपले रामकृष्णबाब नायक. त्यांचे वडील केशवबाब नायक हे मडगांवातील मराठी भाषा, स्त्री शिक्षणविषयक व सामाजिक कार्याचे एक प्रेरणास्थान, आधारस्तंभ होते. वडिलांकडूनच सामाजिक क्षेत्रात काम करण्याचा वसा रामकृष्णबाब यांना मिळाला. तो त्यांनी चार्टर्ड अकाउंटंट झाल्यावरही निष्ठेने जपला. सुखवस्तू आणि सुसंस्कृत कुटुंबात वाढलेल्या व चार्टर्ड अकाउंटंटसारख्या आर्थिकदृष्ट्या खूप फलदायी होऊ शकणाऱ्या व्यवसायामुळे मनात आणले असते, तर ते आपले जीवन ऐषआरामात सुखासीनतेने व्यतीत करू शकले असते; पण सामाजिक बांधिलकीच्या उत्कट जाणिवेने त्यांनी सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले. आपल्या स्नेहशील सौजन्याने व समाजप्रियतेने त्यांनी विविध क्षेत्रांतील असंख्य कार्यकर्ते, विचारवंत, साहित्यिक आणि कलावंत यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध जोडले. अनेक कार्यकर्त्यांना निरनिराळ्या कामाला लावण्यात योजकता दाखवली. न्या. रानडे यांच्याप्रमाणे 'माणसे तयार करण्याची कला' त्यांनी साधली होती. मुंबईत आल्यावर त्यांचा 'गोवा हिंदू असोसिएशन' या संस्थेशी संबंध आला. १९५६ साली त्यांनी या संस्थेचा कला विभाग सुरू करण्यात पुढाकार घेतला होता. भिकू पै आंगले, दामू केंकरे, आनंद पै इत्यादींच्या साथीने त्यांनी या विभागाची स्थापना केली.



**रामकृष्ण नायक**

या संस्थेतर्फे बसवलेल्या पहिल्याच 'खडाष्टक' या नाटकाने 'महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे'त पहिला क्रमांक पटकावला. त्यानंतर 'संगीत संशय कल्लोळ', 'संगीत शारदा' आदी नाटकांसह तब्बल चार वर्षे या स्पर्धेत पारितोषिक जिंकून 'गोवा हिंदू असोसिएशन'ने व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले आणि 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'संगीत मत्स्यगंधा', 'लेकुरे उदंड जाली', 'नटसम्राट', 'बॅरिस्टर', 'संध्याछाया', 'सूर्याची पिल्ले' अशी एकापेक्षा एक सरस नाटके सादर केली. अनेक नाटककार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, संगीत दिग्दर्शक व कलावंत या संस्थेने घडवले. कला विभागाचे प्रतिनिधी असताना ते यशस्वी निर्माते झाले होते. काही काळ निर्माता संघाचे ते अध्यक्षही होते. निर्मात्याच्या अंगी असायला हवेत ते गुण आणि जाण त्यांच्यापाशी होती. नाटकाची, रंगभूमीची जाण, काटेकोर व्यवस्थापन, व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता, नाटककार-कलावंत यांच्याबद्दलची योग्य समज आणि त्यानुसार त्यांच्याशी संबंध राखून ठेवणे, गरज पडली तर आपल्या कक्षेबाहेर जाऊन त्यांना मदत करणे इत्यादी गोष्टींची त्यांना जबरदस्त समज होती. वि. वा. शिरवाडकरांचे 'नटसम्राट' नाटक पाहिल्यावर ज्येष्ठ नागरिकांची व्यथा त्यांच्या हृदयाला भिडली आणि १९८२ पासून त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी 'स्नेह मंदिर' या संस्थेची उभारणी हाती घेतली आणि ती पूर्णत्वास नेली. आज 'स्नेह मंदिर', 'सायंतारा' आणि 'आश्रय' असे तीन विभाग कार्यरत आहेत. या सर्व कार्यासाठी आत्मनिरपेक्ष व निरलस

कार्यकर्त्यांची एक फळीच त्यांनी निर्माण केली होती. त्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य केवळ गोव्यापुरतेच मर्यादित राहिले नाही. गोव्यातील लोकजीवनाचा प्रवाह भारतीय लोकजीवनाशी एकरूप व्हावा, अशा व्यापक जाणिवेने महाराष्ट्रातील 'महाराष्ट्र गोमांतक मैत्री संघ', 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान', 'मराठी साहित्य संमेलन', 'मराठी नाट्य परिषद', 'विज्ञान परिषद', 'गोमंतक निकेतन' अशा अनेक सांस्कृतिक व सामाजिक संस्थांच्या कार्यात त्यांचा सहभाग होता. सामाजिक सेवेला मर्यादा नसते. जात, धर्म आणि काळ याची बंधने नसतात. एखाद्या गरजू मुलाचा शिक्षणाचा भार एखाद्या संस्थेने वा व्यक्तीने उचलल्यास तो नोकरीला लागल्यावर तीन-चार वर्षांत आपल्या कुटुंबाचे जीवनमान बदलू शकतो. त्यात एक वेगळेच समाधान असते, असे त्यांचे म्हणणे असे. अनेक संस्थांच्या कार्यात सदैव प्रामुख्याने कार्यरत असूनही ते प्रसिद्धीविन्मुख राहिले. ते सहसा व्यासपीठावर वावरले नाहीत. 'पडद्यामागील सूत्रधार' असे एका वृत्तपत्राने त्यांच्याविषयी म्हटले आहे, ते सार्थ आहे. लोकमत परिवारातर्फे २०१४ साली 'जीवनगौरव पुरस्कार', २०१६ साली महाराष्ट्र शासनाचा 'नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार' आणि झी टीव्हीचा 'जीवनगौरव पुरस्कार' असा तिहेरी मुकुट रामकृष्णबाब यांना त्यांच्या कार्यामुळे प्राप्त झाला आहे. ३० एप्रिल २०१६ रोजी मुंबईत झालेल्या 'सारस्वत चैतन्य गौरव सोहळ्या'त ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अशा या थोर व्रतस्थाचे अलीकडेच दि. २८ जानेवारी २०२४ रोजी निधन झाले. सारस्वत चैतन्य परिवारातर्फे त्यांना विनम्र आदरांजली.

# चिंतनिका

**आयुष्य फार सुंदर आहे...**

खिशातून ५० ची एक नोट जरी पडली, तरी कावराबावरा अन् बेचैन होणारा 'माणूस' आयुष्याची ५० वर्षं उलटली तरी परिवर्तन येत नाही, बिनधास्तच वागतो! काय दुर्दैव आहे!

स्मशानभूमीची सुरक्षा तपासणी किती कडक आणि मजबूत असते, हे तर विचारूच नका साहेब! अहो, पैसा तर फार दूरची गोष्ट आहे, इथं श्वासही सोबत घेऊन जाऊ देत नाही! तुम्ही कितीही मोठे किंवा तुमची थेट वरपर्यंत ओळख असली तरी!

काळाचा कावळा आयुष्याच्या माठावर बसतो अन् रात्रंदिवस वय पितो!

'माणूस समजतो - मी जगतोय!

माणूस खाली बसून पैसे आणि संपत्ती मोजतो - काल किती होते आणि आज ते किती वाढले आहेत आणि वरती तो हसणारा माणसाचे श्वास मोजतो - काल किती होते आणि आज किती उरले आहेत!

तर चला, 'उरलेले' आयुष्य 'अवशेष' बनण्यापूर्वी त्याला 'विशेष' बनवू या!

'पासबुक' आणि 'श्वासबुक' दोन्ही रिकामे असल्यास भरावे लागतात. पासबुकात 'रक्कम' आणि श्वासबुकात 'सत्कर्म'.

म्हणून

'एकमेकांचा आदर करा. चुका विसरा. अहंकार टाळा.'

'आयुष्य आहे तोपर्यंत हसत हसत घालवा. रडून वा भांडून तरी काय साध्य होणार?'

**जीवनाचे सार**

जीवन जगताना खरंतर कंडक्टरसारखं राहता आलं पाहिजे.

रोज वेगवेगळे प्रवासी सोबत आहेत; पण प्रत्यक्षात कोणीही आपलं नाही.

रोजचा प्रवास आहे; पण प्रत्यक्षात आपल्याला कुठंही जायचं नाही.

ज्यातून प्रवास करायचा ती बसही आपली नाही.

बॅगेत असलेले पैसेही आपले नाहीत.

ड्यूटी संपल्यावर सारं काही सुपूर्द केलं की झालं.

मित्रांनो, जीवन सुंदर आहेच, फक्त आहे त्याचा मनमुराद आनंद घ्या. काही घेऊन गेला नाहीत, तरी सगळ्यांच्या मनात राहून जा, हेच जीवन आहे!

**- अज्ञात**

## दिवाळी अंक २०२३ स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची कथा

# अनोखी सावली



राजस रेगे

**मनीषा विषण्ण नजरेनं क्षणात खचलेल्या आपल्या आई-वडिलांकडं पाहत खुर्चीत कोसळली. विचार करून करून तिचं मस्तक फुटायची वेळ आली. तिला अविनाशचा तर राग आलाच होता; परंतु त्याहून जास्त स्वतःचा राग आला होता. 'आपल्या हातून अशी अक्षम्य चूक घडली, की जी कधीच सुधारता येणार नाही', याची तिला जाणीव झाली. 'आपल्या वडिलांचं समाजातलं स्थान आपल्यामुळं धुळीस मिळालंय', हे तिला पुरेपूर कळून चुकलं...**

सायंकाळी साडेसहा-सातच्या सुमारास डॉ. माधव जोशी आवराआवर करत होते. सगळे पेशंट तपासून झाले, आता घरी जाऊन थोडी विश्रांती घेऊन मग वाचन करू, असं त्यांनी मनाशी ठरवलं. खरंतर तो त्यांचा रोजचाच शिरस्ता होता. एवढ्यात त्यांचा कंपाउंडर गज्या बोकील खोलीचा दरवाजा उघडून आत आला. गज्या हा डॉ. जोशींचा विश्वासू सहकारी. त्यांनी दवाखाना उघडल्यापासून म्हणजेच गेली चोवीस-पंचवीस वर्षं तो त्यांच्याकडेच कंपाउंडर म्हणून काम करत होता. तसा जोशी आणि बोकील घराण्यांचा जुना घरोबा. त्यामुळं त्यांच्यात औपचारिकता नव्हती. रिकाम्या वेळी त्यांच्यात खासगी गोष्टींचीही देवाणघेवाण व्हायची. आजही तसंच काही असेल, अशा समजुतीनं डॉक्टर म्हणाले,

"ये गज्या, काय म्हणतोस?"

गज्या काहीच न बोलता आत येऊन काहीसा अवघडल्यागत उभा राहिला. मग डॉक्टरच म्हणाले,

"अरे, बस की. आणि काय म्हणतोस?"

"खरं म्हणजे, कसं बोलायचं तेच कळत नाहीये डॉक्टर. म्हणजे झालं काय की..." गज्या चाचरत एवढंच बोलला.

"अरे, असं काय करतोस, बोल ना काय असंल ते स्पष्ट."

आता गज्याचा थोडासा धीर चेपला आणि तो बोलू लागला,

"मनीषाबद्दल थोडंसं बोलायचं होतं."

"कोण? आमची मनीषा? तिचं काय? बोल ना मग." डॉक्टर म्हणाले.

"मला कसं बोलायचं तेच कळत नाहीये डॉक्टर; पण बोलणं माझं कर्तव्य आहे. म्हणून बोलतो. मनीषा हल्ली वारंवार देशमुखांच्या मुलासोबत, म्हणजे त्या अविनाशसोबत फिरताना दिसते. परवा दुपारी ती त्या मुलाबरोबर सिनेमा थिएटरमध्ये बसली होती. माझ्या बायकोला दिसली. तिच्याशी ती बोलली तर नाहीच, शिवाय तोंड फिरवून निघून गेली. ही काही पहिलीच वेळ नाही. अनेकदा बागेत, वाचनालयात ती दोघं बसलेली दिसतात. त्याच्या मोटारसायकलवर तर ती अनेकदा मला दिसली. विशेष म्हणजे कॉलेजला दांडी मारणं, ही तर आता नित्याची बाब झालीये."

गज्यानं एका दमात सगळं सांगून टाकलं. तेव्हा त्याला डॉक्टर काहीसे हताश झालेले दिसले. थोडावेळ शांत राहून ते गज्याला म्हणाले,

"अरे, पण तू हे मला आधीच का नाही सांगितलंस?"

"डॉक्टर, खरंतर ही नाजूक बाब. अशा बाबतीत पूर्ण खात्री केल्याशिवाय बोलणं चूकच. म्हणून मी आडून आडून चौकशी केली, तर हे सगळं खरंच दिसतंय. काल तर कमाल झाली. म्हणून मग मला राहवलं नाही." गज्या म्हणाला.

"का, असं काय झालं काल?" डॉक्टरांनी चिंता व्यक्त करत विचारलं.

"देशमुखांची गावात तीन हॉटेल्स आहेत. त्यातल्या बस डेपोच्या बाजूच्या हॉटेलची व्यवस्था हा अविनाश बघतो. तिथं मनीषाचं जाणं खूपच वाढत चाललंय. त्या हॉटेलच्या रूममधून मी स्वतः तिला काल बाहेर पडताना पाहिलं आणि मग मला राहवलं नाही. म्हणून आज आपल्या कानावर घातलं."

डॉक्टर काहीच बोलले नाहीत. वस्तुस्थितीचं गांभीर्य त्यांच्या लक्षात आलं होतं. परिस्थिती हाताबाहेर गेलीये, हेदेखील त्यांनी ताडलं होतं. ते उठले आणि गाडीत जाऊन बसले. रोजच्यासारखं दवाखान्याला कुलूप लावल्यावर किल्ली घेण्याचंही भान त्यांना उरलं नाही. गज्यानं मात्र कुलूप लावून, धावत जाऊन, किल्ली त्यांच्या हातात दिली.

काहीशा विषण्ण मन:स्थितीत डॉक्टर घरी आले.



मालतीबाईंनी म्हणजे त्यांच्या सौंनी त्यांचं स्वागत केलं. त्यांनाही डॉक्टरांची मनःस्थिती रोजच्यासारखी प्रसन्न वाटली नाही. नेहमीप्रमाणे त्यांनी डॉक्टरांना पाणी दिलं आणि त्या चहा करायला किचनकडं वळल्या. तेवढ्यात डॉक्टर म्हणाले,

"मालती, मला नकोय चहा. तू जरा इकडं ये आधी."

मालतीबाईंना आश्चर्य वाटलं. कारण डॉक्टर चहाला कधीच नाही म्हणत नसत. खरंतर त्यांना फक्त चहाचंच व्यसन होतं. मालतीबाई काहीच न बोलता त्यांच्या शेजारी, खुर्चीत बसल्या.

"मालती, मनीषा कुठंय?"

"अहो, असं काय करताय? यावेळी ती क्लासला जात नाही का, माने सरांच्या इथं." मालतीबाई सहज बोलून गेल्या. त्यावर डॉक्टर वैतागून म्हणाले,

"अगं मालती, आपली मनीषा गेले कित्येक दिवस कॉलेजलाही गेली नाहीये. क्लासला जाणं तर दूरच."

"मग ती जाते कुठं? आणि हे तुम्हाला कसं कळलं? मला तुम्ही हे आता अचानक कसं सांगताय?" मालतीबाईंनी नवऱ्यावर प्रश्नांचा भडीमार सुरू केला.

"ती तर रोज सकाळी कॉलेजला जाते म्हणून घरातून निघते. संध्याकाळी चार वाजता नियमित क्लासला जाते. मग ती जाते कुठं?" मालतीबाईंनी पुन्हा विचारलं. त्यावर डॉक्टर तावातावानं म्हणाले,

"अगं, मलाही हे आताच कळलंय. गज्या बोकीलनं सांगितलं." असं म्हणत डॉक्टरांनी सगळी हकिकत मालतीबाईंना सांगितली.

दोघंही हताश झाले होते. नेमकं काय करावं, तेच त्यांना सुचत नव्हतं. थोडावेळ शांत राहून डॉक्टरांनी माने सरानां फोन केला. तेही म्हणाले की, 'गेले दोन महिने मनीषा क्लासलाच आली नाही.' तेव्हा 'ठीक आहे, नंतर बोलतो', असं म्हणून डॉक्टरांनी फोन ठेवला.

रात्रीचे जवळपास आठ वाजले असतील, एवढ्यात समोरचा दरवाजा उघडून मनीषा आत आली. आई-वडिलांना समोर एकत्र पाहून ती मनातून चरकली, पण तिथंच न थांबता ती आपल्या खोलीकडं वळली. तेवढ्यात 'मनीषा, इकडं ये' म्हणून आईनं हाक मारली. आईच्या आवाजातली जरब मनीषाला अनपेक्षित होती. तिच्या मनात शंकेची पाल चुकचुकली, तरीही धीर एकवटून ती समोर येत म्हणाली,

"काय गं आई?"

"तू आता कुठून येते आहेस?" आईऐवजी डॉक्टरांनीच विचारलं. तेव्हा मनीषा उत्तरली,

"क्लासहून डॅडी."

"मनीषा, खोटं बोलतेयस तू. गेल्या दोन महिन्यांपासून तू क्लासला गेलेलीच नाहीस. आता खरं खरं सांग, कुठं गेली होतीस." डॉक्टरांनी दरडावून विचारलं. मनीषा घाबरून तशीच शांत उभी राहिली. वडिलांना सर्व समजल्याचं तिच्या लक्षात आलं. म्हणून तिनं काहीच उत्तर दिलं नाही. तेव्हा आई पुढं होऊन म्हणाली,

"मनीषा, डॅडी काय विचारतायत, तू कुठं गेली होतीस? पटकन उत्तर दे."

आता मात्र मनीषाचं अवसान गळालं होतं. काय उत्तर द्यावं, ते तिला कळत नव्हतं. ती मान खाली घालून तशीच उभी होती.

"अविनाश देशमुखला तू कधीपासून ओळखतेस. त्याच्याबरोबर कुठं कुठं फिरतेस? त्याच्या हॉटेलमध्ये, त्याच्या रूमवर रोज जाऊन काय करतेस? नेमकं काय चाललंय तुमचं? परवा तुम्ही सिनेमाला गेला होतात. हे सगळं काय चाललंय?" डॉक्टरांनी एका दमात सगळं विचारलं.

"मनीषा, तू लग्न करणार आहेस त्याच्याशी? काय ठरवलं आहेस, उत्तर दे." आई म्हणाली.

मनीषा काही न बोलता रडू लागली.

"ठीक आहे. काय तो सोक्षमोक्ष होऊन जाऊदे. तू त्याला फोन कर आणि आत्ता इथं बोलव. मला त्याच्याशी बोलायचंय. उद्या त्याच्या वडिलांशी बोलून दोन दिवसात लग्न उरकून घेऊ. त्यानंतर तू आणि तुझं नशीब. लाव त्याला फोन." डॉक्टर रागारागात म्हणाले.

# सारस्वत हितवर्धक मंडळ

॥ संहतिः कार्यसाधिका ॥

१९२४-२०२४

१०० शतक महोत्सव

सारस्वत भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोगल लेन), माहीम, मुंबई - ४०००१६

8828800727 | shm1924@rediffmail.com | www.bhalavalikarsaraswat.org

**समाज बांधवांनी सर्वांगीण प्रगती साधून उत्तम आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा मिळवावी अशा ध्येयाने प्रेरित १९२४ सालापासून कार्यरत असलेली भालावलीकर सारस्वतांची संस्था**

## माहीममध्ये मध्यवर्ती, सोईस्कर जागी संस्थेची इमारत व २५० आसन क्षमतेचे वातानुकुलित सुसज्ज सभागृह



### इतर उपक्रम

- **शिक्षण**
  आर्थिक, गणवेश व इतर साहित्याची मदत, विद्यार्थी शैक्षणिक मार्गदर्शन, शिक्षकांना प्रशिक्षण, शाळांना शिक्षण साहित्य, विद्यार्थी गुणगौरव
- असहाय्यांना आर्थिक मदत
- समाजातील कार्यशील, यशवंत व्यक्तींचा सन्मान
- मंडळाच्या क्षेत्रातील योग्य कार्याला कृतिशील प्रोत्साहन
- **वैद्यकीय**
  आरोग्य, नेत्र तपासणी शिबीर, गरजू रुग्णांना अर्थसहाय्य
- वधुवर नोंदणी व मेळावा
- सामुहिक व्रतबंध

तेव्हा मनीषानं धीर करून फोन लावला आणि 'आत्ता लगेच आमच्या घरी ये', असं अविनाशला म्हणाली. तेव्हा तो तिच्यावर खूप भडकला आणि म्हणाला,

"मी का येऊ? माझा काय संबंध? मी कुणाच्या घरी वगैरे येत नाही."

"अरे, असं काय करतोस? डॅडींना तुझ्याशी बोलायचंय आपल्याबद्दल." मनीषा त्याला समजावू लागली. तेव्हा तिचं काहीच एकून न घेता अविनाश म्हणाला,

"हे बघ मनीषा, मी तुला स्पष्टच सांगतो, आपल्यात जे काही आहे ते तुझी आणि माझी गरज म्हणून आहे. हा राजीखुशीचा मामला आहे. मी काही तुझ्यावर सक्ती केली नाही. तू तुझ्या इच्छेनं येतेस. बस्स् मी तुला रिस्पॉन्स दिला एवढंच. आणि तसंही लग्नाचं म्हणशील तर ते अशक्य आहे. माझ्या पप्पाना ते बिलकूल मान्य नाही."

"पप्पांना मान्य नाही म्हणजे? म्हणजे, हे तुझ्या घरी माहिती आहे?" मनीषानं आश्चर्यानं विचारलं.

"हो! आणि पप्पाच म्हणालेत की अशा मुलीशी तुझं लग्न कदापि होणार नाही. आमच्या खानदानाला साजेशा घराण्यातल्या, ते ठरवतील त्याच मुलीशी मला लग्न करावं लागेल आणि तेही ठीकच आहे ना? म्हणून मीही 'हो' म्हटलंय त्यांना." अविनाश बिनधास्त बोलत होता. त्यावर मनीषानं हताश होऊन त्याला पुन्हा विचारलं,

"तुला मान्य आहे हे?"

"हो. म्हणून तर म्हणतोय, हे बघ, तुला जर हे मान्य नसेल आणि मला भेटायचं नसेल, तर तुझी इच्छा, माझी काहीही हरकत नाही." एवढं बोलून अविनाश फोन कट करतो.

फोन स्पीकर मोडवर होता. त्यामुळं डॉक्टर आणि मालतीबाईंनी त्या दोघांचंही पूर्ण संभाषण ऐकलं होतं. आपल्या मस्तकावर कुणी घणाचे घाव घालतंय की काय, असा भास मनीषाला होत होता. अविनाशबरोबर घालवलेला क्षणन्‌क्षण तिच्या डोळ्यासमोर तरळू लागला. अविनाश असा कसा वागला, याचंच तिला आश्चर्य वाटलं. ती हतबल झाली. डॉक्टर जोशी आणि मालतीबाई यांची स्थिती तर केविलवाणी झाली होती. डॉक्टर उठले, तेव्हा त्यांना किंचित भोवळ आल्यागत वाटलं. पटकन त्यांनी भिंतीचा आधार घेतला आणि एक एक पाऊल टाकत ते आपल्या बेडरूमकडं निघाले. मालतीबाईही त्यांच्या मागोमाग धावल्या.

मनीषा विषण्ण नजरेनं क्षणात खचलेल्या आपल्या आई-वडिलांकडं पाहत खुर्चीत कोसळली. विचार करून करून तिचं मस्तक फुटायची वेळ आली. तिला अविनाशचा तर राग आलाच होता; परंतु त्याहून जास्त स्वतःचा राग आला होता. 'आपल्या हातून अशी अक्षम्य चूक घडली आहे, की जी कधीच सुधारता येणार नाही', याची तिला जाणीव झाली. 'आपल्या वडिलांचं समाजातलं स्थान आपल्यामुळं धुळीस मिळालंय', हे तिला पुरेपूर कळून चुकलं.

कितीतरी वेळ अवघडल्यागत ती खुर्चीत पडून होती. स्वतःला क्षमा करायला तिचं अपराधी मन तयार होईना. आता खूप रात्र झाली होती. तिनं मनाशी एक निर्णय पक्का केला आणि ती आपल्या खोलीत निघून गेली.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणं गज्या बोकील दवाखान्याची किल्ली घेण्यासाठी सकाळी आठ वाजता आला. डॉक्टर त्याच्या हातात किल्ली देत म्हणाले,

"गजा, आज मी दवाखान्यात येत नाही. नवीन पेशंट घेऊ नकोस, लवकर दवाखाना बंद केलास तरी चालेल."

किल्ली घेऊन गज्या वळणार तोच माडीवरून मालतीबाईंची किंकाळी ऐकू आली. डॉक्टर आणि गज्या जिना चढून मनीषाच्या खोलीकडं धावले. दरवाजा सताड उघडा होता. खोलीच्या तुळईला साडीची घट्ट गाठ घालून मानेभोवती पीळ आवळला होता आणि मनीषाच्या अचेतन देहाला बिलगून मालतीबाई आक्रोशत होत्या. अचेतन देहाची आणि सचेतन जिवाची अनोखी सावली दूरवर दिसून येत होती.

सुप्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. माधव जोशींचा नियतीनं असा अकारण पराभव केला होता.

***

– लेखक 'गौड सारस्वत ब्राह्मण समाज, सिंधुदुर्ग'चे संस्थापक आहेत.

संपर्क : ९५७९७६८०८५

---

**आवाहन**

'सारस्वत चैतन्य'चे देणगीदार, जाहिरातदार आहेत अशांनीच वयाची पंचाहत्तर, ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यावर कौटुंबिक अभीष्टचिंतन सोहळ्याचा फोटो पाठवल्यास त्यास जागेच्या उपलब्धतेनुसार विनाशुल्क प्रसिद्धी दिली जाईल. लग्न, मुंज यांचे फोटो छापले जात नाहीत. (जाहिरात शुल्कात सवलत देऊन छापले जातील.)

**- संपादक**

**आवाहन**

सारस्वत चैतन्यकडे मजकूर पाठविताना तो टाईप करून पीडीएफ व वर्ड फाईलमध्येच आणि Chaitanyamag@gmail.com या मेलवरच पाठविणे.

**- संपादक**

# सारस्वत दीनवत्सल संघ

**स्थापना : दसरा दि. ५ ऑक्टोबर १९०८**

द्वारा: सारस्वत ब्राह्मण समाज, मधुकोष, सारस्वत बँक बिल्डींग,
१ला मजला, शं. वि. सोवनी पथ, गिरगांव, मुंबई - ४०० ००४
दुरध्वनी: २३८९ ८९९४, द्वारा: २३८६ २२६९, ईमेल: saraswatdeenvatsalsangh@gmail.com

## सारस्वत दीनवत्सल संघाचे उद्देश

**गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील निरनिराळ्या पोटभेदांकडे लक्ष न देता अनाथ, अविवाहीत स्त्रिया, विधवा, असहाय्य, अपंग व विपदग्रस्त अशा व्यक्तींना आर्थिक, वैद्यकीय मदत करणे व ज्ञातीतील अनाथ प्रेतसंस्कारास मदत करणे. गेली ११६ वर्षे हे मदतकार्य निरंतर चालू आहे.**

## दीनवत्सल संघाकरिता आपण काय करावे

१. सभासद नसलेल्यांना सभासद करावे

२.सभासद असलेल्यांनी अनुकुलतेप्रमाणे आपली वर्गणी वाढवावी.

३.विवाह, व्रतबंध यासारख्या मंगल व आनंददायक प्रसंगी देणगी द्यावी

४.प्रत्येक बंधु-भगिनींनी एकतरी सभासद मिळवून द्यावा.

५.स्मारक निधी साठी भरभरून देणगी द्यावी

६.ज्याना उत्साह व आवड असेल त्यांनी संघाचे स्वयंसेवकत्व पत्करून त्याचे सभासद वाढविण्यास, दिवाळी व इतर योग्य प्रसंगी देणग्या जमविण्यास हातभार लावावा.

७.परिचयातील अनाथ, अविवाहीत स्त्रिया, विधवा, असहाय्य, अपंग व विपदग्रस्त अशा व्यक्तींना संघ देत

## सभासदांचे प्रकार

| | | |
|---|---|---|
| आश्रयदाता | : | रू. ५०००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| वाली | : | रू. २०००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| सहाय्यक | : | रू. १०००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| तहह्यात | : | रू. ५००/- अगर त्याहून जास्त देणारे |
| हितचिंतक | : | संघाचा उद्देश साधण्यासाठी वेळोवेळी उदार अंत:करणाने देणग्या देऊन सहाय्य करणारे (हितचिंतक, कोणत्याही धर्माचे अगर ज्ञातीचे असू शकतात) |
| स्मारकनिधी | : | कोणत्याही दिवंगत व्यक्तीच्या स्मरणार्थ रू २०००/- अगर त्याहून जास्त रक्कम संघाकडे पाठविल्यास त्या नावाने स्मारक निधी प्रस्थिपित करण्यात येतो. |
| वार्षिक निधी | : | संघ मदत करत असलेल्या एक गरजू व्यक्तीस दत्तक घेऊन रू १६०००/- वार्षिक मदत करणे |


**देणगीदारांना ८० जी अंतर्गत करसवलत उपलब्ध आहे.**

व्यवस्थापक मंडळ

**सारस्वत दीनवत्सल संघ, मुंबई**

कार्यालयीन वेळ : सायंकाळी ६.०० ते ८.३० (रविवार बंद)

## दिवाळी अंक २०२३ स्पर्धेतील तिसऱ्या क्रमांकाची कथा



शैलजा कामत

# लाल मफलर

सिग्नलला एक पांढरी मोठी मोटार थांबली. त्यात पुढं आईच्या मांडीवर बसलेल्या मुलीच्या गळ्याभोवती एक छान लाल मफलर गुंडाळलेला देवीने पाहिला आणि 'तो मला पाहिजेच' म्हणून हट्ट धरला. गाडी तर सुटली, पण अचानक तिच्या अंगाला चाटून काहीतरी पटकन् खाली पडलं. तिनं पाहिलं. बघते तर काय, तोच लाल मफलर. त्या क्षणापासून तो मफलर आणि ती जणू जिवाभावाच्या मैत्रीणीच झाल्या...

मुंबईतल्या एका मोठ्या शहरातली ही छोटीशी गोष्ट आहे. खूप वेळ थांबणारा, वर्दळीच्या जागी असलेला मोठा सिग्नल होता तो. चारही बाजूला रस्ते जात होते. सुंदर-सुंदर मोटार गाड्या, पादचारी यांची दिवस-रात्र तुफान वर्दळ. समोरच एक गणपतीचं देऊळ. जरा आतल्या बाजूला पटांगण आहे. त्याच्या पाठच्याच बाजूच्या गल्लीत चर्चदेखील आहे. आणि अशा हरतऱ्हेच्या रंगीबेरंगी वातावरणात आमची इटुकली आठ वर्षांची देवी आणि तिची आजी, रस्त्याच्या कडेला छोटंसं प्लास्टिक लावून, चार दांड्यांवर उभ्या केलेल्या खोपटांत राहत होती. आजीला ती आणि तिला आजी. इन मिन दोघींचं विश्व त्यांनी उभं केलं होतं. इतक्या गोड मुलीच्या भूतकाळाबद्दल साऱ्यांनाच उत्सुकता असे. घरच्यांबद्दल म्हणाल, तर आजीकडून कळलं की देवीच्या जन्मानंतर काही दिवसातच तिचे आई-वडील तिला पोरके करून देवाघरी गेले. आजीवर आकाश कोसळलं, तरी हिंमत न हारता लहानग्या देवीला तिने आईची माया दिली. हळूहळू आमची आजी पूर्णपणे देवीमय झाली. 'देवी एके देवी' असं तिचं झालं होतं. जर क्षणभर जरी ती दृष्टीआड झाली, तरी आजीच्या छातीचा ठोका चुके. उदरनिर्वाहासाठी काहीतरी करायला तर हवेच होते. तिने देवीसाठी तिला बरोबर घेऊनच सिग्नलकडे थांबणाऱ्या गाड्यांसमोर चक्क भीक मागायला सुरुवात केली. सिग्नल मोठा होता, त्यामुळं तिला थोडा वेळ मिळे. तिच्याबरोबर गजरेवाली, शेंगदाणे विकणारा गणू असे दोन-तीन लोक कायम असायचे. तिथंच रस्त्यावर जवळपास राहायचे. देवीला तेवढा परिसर म्हणजे आपलं मोठं घर आणि त्यातलं मोठं कुटुंब वाटायचं. खरंतर देवीनं 'भीक मागणं' आजीला अजिबातच आवडत नसे, पण ती सतत डोळ्यांसमोर राहावी म्हणून तिचा हा खटाटोप होता. त्या नीटनेटक्या, स्वच्छ कपडे घातलेल्या, गोड चेहऱ्याच्या निरागस देवीला हसताना पाहून गाडीतली लोकं आपोआपच तिच्यापुढं केलेल्या हातावर कधी चॉकलेट, कधी खेळणी, तर कधी एखादा खाऊ वगैरे ठेवत असत. काही जण तर तिचे गालगुच्चेही घेतं. अशा भेटी मिळाल्या की ती खूश होऊन आनंदानं नाचायची, बागडायची. आणि हे त्या गाडीतल्या लोकांसाठी खास असायचं. कित्येक जण तो सिग्नल येण्याची आणि देवीला भेटण्याची आतुरतेनं वाट पाहत असायचे. कधीतरी अचानक देवी मधेच अदृश्य व्हायची आणि फादर अंकलकडे धूमकेतूसारखी उगवायची. मग गणूदादा तिला बरोबर पकडून आणायचा. एकदा काय झालं, सिग्नलला एक पांढरी मोठी मोटार थांबली. त्यात पुढं आईच्या मांडीवर बसलेल्या मुलीच्या गळ्याभोवती एक छान लाल मफलर गुंडाळलेला तिने पाहिला आणि 'तो मला पाहिजेच' म्हणून हट्ट धरून बसली. गाडी तर सुटली होती, पण अचानक तिच्या अंगाला चाटून काहीतरी पटकन् खाली पडलेलं तिनं पाहिलं. बघते तर काय, तोच लाल मफलर. त्या क्षणापासून तो मफलर आणि ती जणू जिवाभावाच्या मैत्रीणीच झाल्या होत्या.

ती स्वतः आपल्या मफलरवर बेहद खूश असायची. कायम किती छान, मऊमऊ म्हणत त्यावर हात फिरवत बऱ्याचदा झोपीही जायची. थोड्या दिवसांनी सर्व लोक तिला गंमतीत 'लाल रुमालवालीच' म्हणू लागले. ती आजीला म्हणायची, 'तुला जर माझी आठवण आली ना आजी, मी नसताना जवळ, तर हा माझा लाल मफलर घे हा! म्हणजे मी तुझ्या मिठीत असल्यासारखं वाटेल तुला.' तिचं प्रेम बघून आजीचा ऊर भरून यायचा. आजीच्या कुशीत देवी छान विसावायची. दिवसा मागून दिवस जात होते. आला दिवस कसा गेला, हे रोजच्या दिनक्रमात त्या दोघींनाही कळत नव्हतं. आजी आणि नात दिलखुलासपणे जगत होत्या. बारीकसारीख दुखणं झाल्यास काळजी घ्यायला आजूबाजूचं कुटुंब होतंच. देवळातले नाना भटजी देवीला मैत्रिणींबरोबर खेळताना बोलवून प्रसाद द्यायचे आणि देवीचा गालगुच्चा घेऊन एक पेढा जास्ती द्यायचे. मग ती खूश होऊन उड्या मारायची. 'नाना आजोबा परत उद्या येईन हं प्रसाद खायला', असं म्हणून पसार व्हायची.

पण दर बुधवार मात्र तिच्यासाठी खूपच खास असे, ज्याची ती डोळ्यात तेल घालून चातकासारखी वाट पाहायची. ते म्हणजे फादर अंकलला भेटण्यासाठी. तेही तिच्याबरोबर खूप वेळ घालवायचे. भेटवस्तू देऊन छान-छान खाऊ देऊन तिच्याबरोबर



॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

# बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण निधी

स्थापना : दि. ७ जून १९१४

नोंदणी क्र. एफ ८ (मुंबई) दि. ३०-१२-१९५२

## बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील एकमेव सामाजिक संस्था

- १०८ वर्षांची ज्ञातीतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीची परंपरा
- आतापर्यंत २५०० हून अधिक विद्यार्थ्यांना ₹. २०,००,००० हून अधिक मदत
- बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना भरघोस पारितोषिके
- गरीब, निराधार, वरिष्ठ नागरिकांना पेन्शनसदृश मासिक आर्थिक मदत
- इस्पितळात येणाऱ्या खर्चाकरिता गरजू ज्ञातीबांधवांना मदत • वैद्यकीय मदत
- बारदेशकर ज्ञातीतील असामान्य मान्यवरांना पुरस्कार



## आगामी योजना

- वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष आर्थिक मदत
- परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अंशतः मदत





## विशेष

- १९०० हून अधिक सभासद
- सभासदत्व सर्व ज्ञातीबांधव/भगिनींसाठी खुले.
- निधीच्या विविध उपक्रमांसाठी देणग्या स्वीकारार्ह.

पत्ता : २, राजाराम निवास, प्लॉट नं. १७७, सर भालचंद्र मार्ग, हिंदू कॉलनी, दादर (पू.), मुंबई - ४०००१४.
ई-मेल: bardeshkar@gmail.com | website - www.bardeshkargsbnidhi.com

खूप खेळायचे. आजीही नेहमी तिच्याबरोबर असायची. गणूला ती न चुकता राखी बांधायची. सगळं कसं अलबेल होतं, पण एक दिवस अचानक देवीनं देवळात बसल्या-बसल्याच मान टाकली. ती बेशुद्ध पडली. सारे खूप घाबरले. लोकांच्या हल्लकल्लोळामुळे जवळच्या चौकीवरचा पोलीस हवालदार धावत आला आणि ताबडतोब त्याने तिला हॉस्पिटलमध्ये नेण्यास मदत केली. गणूदादा तिच्याबरोबर राहून आजीलाही सावरायचं काम करत होता. आजी देवीच्या पलंगाशेजारी रात्रभर डोळ्यात तेल घालून बसली होती. देवीला शुद्ध कधीच आली होती.

श्रमाने तिला ग्लानी आली होती, असं डॉक्टर म्हणाले. पण मानसिक ताणामुळे आणि वयामुळे आजीची मात्र तब्येत फार बिघडू लागली होती. तिचे डोळे सारखे मिटत होते आणि डोळ्याचं पातं लवतं न लवतं म्हणेपर्यंत तिचा ताप चढतच होता. क्षणातच ती खुर्चीत कोसळली. नशिबानं एका नर्सचं तिच्याकडं लक्ष गेलं आणि तिनं तिला डोक्याला मार लागण्यापूर्वी धरलं. आजीला तातडीनं अति दक्षता विभागात न्यावं लागलं. देवीची आणि आजीची ताटातूट झाली होती. जाग आल्यावर देवीनं आजीच्या नावाचा गजर चालू केला. आजी कुठं? ह्या सततच्या प्रश्नांनी सगळ्या नर्सेसच्या तोंडचं पाणी पळालं. खरं सांगून चालणार नव्हतं. तिला भेटताच आलं नसतं आणि खोटं सांगून देवीसारख्या चतुर मुलीला काही पटलंच नसतं. अखेर 'आजीला दुसऱ्या खोलीत आराम करायला ठेवलंय' असं तिला सांगितलं. इतक्यात एका आयाने न राहावून तिला आजी खूप आजारी असल्याचं सांगितलं. झालं. देवीची जमदग्नी झाली. खूप आदळ-आपट, आरडाओरड, आकांडतांडव झालं, आजीला भेटण्यासाठी अखेर देवीचा जीवघेणा अक्रीत कांगावा बघून साऱ्यांनी हात टेकले आणि आजीला भेटवायाचं आश्वासन दिलं. तेव्हा कुठं ती दोन घास खाऊन शांतपणे झोपली. 'विधिलिखीत ललाटम्' म्हणतात ते काही खोटं नाही. दुसऱ्या दिवशी जाग आली, तेव्हा गळ्याचा लाल मफलर काढून हातात घेत देवी आजीकडं जायला निघाली. तिला आजीला मफलर द्यायचा होता. नर्स तिला घेऊन गेली. आजीला पाहताच देवीचं सारं अवसानच गळून पडलं. आजीची अवस्था बघून ती रडू लागली. तिला लावलेल्या केवढ्यातरी नळ्या, टोचलेल्या अमाप सुया आणि आजूबाजूच्या औषधांच्या बाटल्या, हे सारं सारं तिच्या डोळ्यात साठवायच्या आणि कळण्याच्या पलीकडचं होतं. तिला फक्त ऐवढंच कळत होतं, की आजीला खूप-खूप जास्त बरं वाटत नाहीये. ती तिला जोरजोरात हलवून उठवू पाहात होती, पण तिथल्या नर्सनं डोळे मोठे केले. तिला बिचारीला काय ठाऊक, की आजी पूर्णपणे कोमात गेलीय म्हणजे काय ते? ती नर्सला म्हणू लागली, 'आजी किती छान झोपलीय. मी बसू तिच्याजवळ, ती उठेपर्यंत?' पण लगेचच नर्सने तिला इच्छेविरुद्ध तिच्या वॉर्डमध्ये नेलं. जाताना पूर्णवेळ देवी आजीच्या नावाचा जप करत होती. इकडं अथक प्रयत्नांनी, मृत्यूशी झगडून अखेर देवीच्या आजीची प्राणज्योत मालवली. देवीला ही दुःखद बातमी कशी सांगायची, हा पेच साऱ्यांना पडला. अखेर एका नर्सवर ही जबाबदारी सोपवण्यात आली. ती तिला हळूवारपणे आजीकडं घेऊन गेली. ध्यानीमनी नसतानाही अचानक गाढ झोपलेली आजी पाहून देवी बऱ्यापैकी बाचकली. घाबरून नर्सला घट्ट धरत तिने विचारलं, 'मला भेटायचं असलं तर आजी जागी राहून माझी वाट बघायची. मग आज ती झोपली कशी?' सरकन् ती आजीजवळ गेली आणि तिच्या तोंडावरून प्रेमानं हात फिरवून तिला उठवण्याचा प्रयत्न करू लागली आणि म्हणाली, 'आजी, किती झोपतेस आळशासारखी? उठ उठ. हा बघ माझा लाल रुमाल तुझी वाट पाहतोय.' निरागसपणे ती आजी उठण्याची वाट पाहत होती. कधी एकदा ती उठते आणि तिला मिठीत घेऊन, छातीशी कवटाळून हिच्याशी गुलुगुलु गप्पा मारते, असं तिला झालं होतं. तिला बापडीला कुठं माहीत होतं, की तिची आजी आता कधीच डोळे उघडून घेऊ शकणार नाही. तिच्याशी बोलू शकणार नाही. देवीची अवस्था बघून साऱ्यांचे डोळे पाणावले. तिकडं आजीला अंत्यविधीसाठी नेऊ लागले आणि इकडं नर्स देवीला पुन्हा तिच्या वॉर्डमध्ये घेऊन जाऊ लागली, पण एका झटक्यात देवी नर्सचा हात सोडून सुसाट वेगानं आजीच्या स्ट्रेचरजवळ आली आणि थांबून किंचाळली, 'थांबा थांबा. नेऊ नका माझ्या आजीला! मला तिला भेटायचंय!' तिने धावत जाऊन जवळच असलेला स्टूल ओढून आणला आणि त्यावर उभं राहून तिने हातातला 'लाल रुमाल' पांढरी चादर वर करून आजीच्या हातावर ठेवला. क्षणभर आजीला डोळे भरून पाहिलं. हे सारं क्षणातच डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच झालं. मगं तिला पुन्हा खेचूनच आजीपासून दूर करण्यात आलं आणि क्षणार्धात आजी दिसेनाशी झाली.

अखेर देवीनं रुमालाच्या रूपानं का होईना, पण आजीला शेवटची मिठी मारली. ती कायम म्हणायची, 'मी नसेन तर हा माझा लाल रुमाल म्हणजेच मीच समज.' अगदी तसंच झालं. एवढासा जीव, पण जाण किती अफाट. समज आणि प्रसंगावधानता केवढी! आता सर्व मंडळी पोहोचली होती. फादर अंकलने गोंधळलेल्या देवीचा रडून थकलेला-भागलेला, कोमजलेला चेहरा पाहताच न राहवून पटकन तिला उचलून घेतलं आणि आश्चर्यचकितपणे बघणाऱ्या आणि तिथं जमलेल्या सर्व लोकांना उद्देशून ते म्हणाले, 'इथून पुढं ही चिमणी माझी मानसकन्या असेल. ह्या पोरक्या जिवाचं मी कायद्यानं पालकत्व घेणार आहे. माझ्या जिवापेक्षाही तिला जास्त जपेन.'

एव्हाना देवी तिच्या लाडक्या फादर अंकलच्या खांद्यावर शांतपणे, गाढ झोपली होती. हे सारं घडल्यामुळं साऱ्यांच्याच पायाखालची जमीन सरकल्यासारखं वाटत होतं... ***

*- शैलजा कामत या कथालेखन व ललितलेखन करतात.*
*संपर्क : ९८२०७०१३७८*

## दिवाळी अंक काव्य स्पर्धा २०२३ - प्रथम क्रमांकाची कविता

### तूच माझा वाली

(चाल - पोटापुरता पसा पाहिजे...)

जामीन नाही, अटक होण्याची देवा वेळ ही आली
वाचव माझी इज्जत आता तूच माझा रे वाली ॥धृ॥

लाचेपोटी भरपूर पैसा गोळा केला देवा
चिंता पडली लपवून कोठे ठेवू आता हा ठेवा
गोळी घेतल्याविना मला रे झोप येईना झाली
वाचव माझी इज्जत आता तूच माझा रे वाली ॥१॥

जमीनजुमला घेत राहिलो फिरून सारी गावे
लॉकर भरले दागिन्यांनी किती मला ना ठावे
बांधून झाला पॉश बंगला मर्सिडीजही आली
वाचव माझी इज्जत आता तूच माझा रे वाली ॥२॥

विसरून गेलो तुजला देवा जमवित असता पैसा
ध्यानीमनी ना कधी वाटले प्रसंग येईल ऐसा
अस्तित्वाची तुझ्या रे देवा जाणीव आता झाली
वाचव माझी इज्जत आता तूच माझा रे वाली ॥३॥

सील ठोकुनी संपत्तीला करतील मजला डंख
राजावाणी जगलो होतो होईन आता रंक
पापाच्या पैशाची धुंदी उतरून आली खाली
वाचव माझी इज्जत आता तूच माझा रे वाली ॥४॥

**- डॉ. सतीश कानविंदे -**

## दिवाळी अंक काव्य स्पर्धा २०२३ - द्वितीय क्रमांकाची कविता

### स्वप्नभंग

जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात कुठे?
होतात का ती पडझड झालेली एक विराण कोठी?
रानटी वेलींनी वेढलेली, वड, पिंपळ उगवलेली
का होतात ती एक सुकलेले विस्तीर्ण पात्र नदीचे
भेगाळलेले, दुभंगलेले थेंबभर पाण्यासाठी आसुसलेले
सांगा, जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात तरी कुठे?

जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात कुठे?
होत असावीत ती एक गरगरते आवर्त
भिरभिरणारे, वळसे घेत सवे सृष्टी उध्वस्त करणारे
वा होत असावीत ती एक जगड्व्याळ अग्निसर्प
विषारी फुत्कारे टाकत सभोवर अग्निप्रलय घडवणारे
सांगा, जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात तरी कुठे?

जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात कुठे?
होतात का ती भाळी भळभळणारी जखम अश्वत्थाम्याची?
अमरत्वाचा शाप घेऊन मुक्तीच्या प्रतिक्षेतली
का होतात ती जन्मांतरीचे संचित वाहणारी
काही आयुष्य, कर्मांचे भोग भोगत निमुटपणे जगणारी
सांगा, जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात तरी कुठे?

जी होतात भंग स्वप्न, ती स्वप्न जातात तरी कुठे?
होत असतील काही राखेतून पुनःश्च भरारी घेणारे फिनिक्स पक्षी
वा होत असतील काही रंग, आकार बदलणारी
कॅलेडोस्कोपमधील नक्षी
स्वप्नांना द्यावा थोडा आधार, मायेचा हळुवार स्पर्श
अन् पाहावा आभाळाच्या डोळ्यांमधला बरसणारा हर्ष

**- शैलेश पोतदार -**

*जेव्हा अडचणी असतात तेव्हा प्रामाणिक रहा, जेव्हा आर्थिक परिस्थिति चांगली असेल तेव्हा साधे रहा, जेव्हा एखादं पद किंवा अधिकार असेल तेव्हा विनयशील राहा, जेव्हा अत्यंत रागात असाल तेव्हा अगदी शांत राहा, यालाच आयुष्याचे सुयोग्य व्यवस्थापन असं म्हणतात.*

# सारस्वत चैतन्य गौरव सोहळा २०२३

प्रांत, जाती, पोटभेद बाजूला सारून सर्व सारस्वतांमध्ये सुसंवाद घडून यावा; त्यांच्यात सांस्कृतिक व वैचारिक देवाण-घेवाण वाढीस लागावी. ज्ञातीतील कर्तृत्ववान व्यक्तींचा समाजाला परिचय व्हावा आणि त्यांचा यथोचित गौरव व्हावा या उद्देशाने आयोजित केला जाणारा 'सारस्वत चैतन्य गौरव सोहळा' या वर्षीही थाटामाटात संपन्न झाला...
या सोहळ्याचा थोडक्यात घेतलेला आढावा...




'सारस्वत प्रकाशन' ही प्रांत, जाती, पोटभेद बाजूला सारून सर्व सारस्वतांमध्ये सुसंवाद घडून यावा; त्यांच्यात सांस्कृतिक व वैचारिक देवाण-घेवाण वाढीस लागावी या उद्देशाने १९८६ पासून कार्यरत असणारी संस्था आहे. त्याच उद्देशपूर्तीच्या हेतूने 'सारस्वत चैतन्य त्रैमासिक' व 'सारस्वत चैतन्य पुरस्कार' हे दोन उपक्रम संस्था अविरतपणे चालवते आहे.

'सारस्वत चैतन्य गौरव सोहळा २०२३' या वार्षिक गौरव व सन्मान समारंभाचे आयोजन १० डिसेंबर २०२३ रोजी रवींद्र भवन, मडगाव, गोवा येथे करण्यात आले होते. हा सोहळा सारस्वत प्रकाशन, मुंबई आणि गोवा सारस्वत समाज, मडगाव या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सारस्वत समजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मुंबई, पुणे, डोंबिवली, कुडाळ, कोल्हापूर, बेळगाव येथील आयोजनानंतर या वर्षीचा गौरव सोहळा गोवा या सारस्वतांच्या आद्यभूमीत अतिशय थाटामाटात संपन्न झाला. या गौरव सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे पर्यटन, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि संपर्क मंत्री नामदार रोहन खंवटे उपस्थित होते. सोहळ्याची शोभा गोवा राज्याचे विद्यमान आमदार विजय सरदेसाई व माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान आमदार दिगंबर कामत यांच्या विशेष अतिथी रूपाने वाढली.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे माननीय पर्यटन व माहिती तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे, गोवा सरकार, तसेच मडगावचे माननीय आमदार दिगंबर कामत, सारस्वत प्रकाशनचे अध्यक्ष दिलीप भिसे, विश्वस्त व सारस्वत चैतन्यचे संपादक सुधाकर लोटलीकर, कार्याध्यक्ष राजेंद्र देसाई, कार्यवाह राहुल साखळकर, तसेच सारस्वत बँकेचे संचालक सुनील सौदागर, गोवा सारस्वत समाज, मडगाव या संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ देश प्रभूदेसाई, कार्यवाह खजिनदार उपस्थित होते.

माननीय विजय सरदेसाई (विद्यमान आमदार, फातोर्डा व माजी उपमुख्यमंत्री) हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिले, मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते जास्त वेळ थांबू शकले नाहीत.

समारंभाच्या सुरुवातीला 'सारस्वत प्रकाशन संस्थे'च्या आजवरील कार्याविषयी दृकश्राव्य माध्यमातून माहिती दाखविण्यात आली. तसेच मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

निवेदक सुप्रसिद्ध कवी, लेखक व सारस्वत प्रकाशनचे सं. कार्यवाह प्रसाद कुलकर्णी व स्मिता संझगिरी यांनी अनुक्रमे मराठी व कोकणी भाषेतून उपस्थितांचे स्वागत केले. सारस्वत प्रकाशनचे

कार्यवाह राहुल साखळकर यांनी सर्व मान्यवर पाहुण्यांचे, विशेष अतिथींचे व सर्व श्रोत्यांचे स्वागत केले. आपल्या छोटेखानी भाषणात २३व्या गौरव सोहळ्याची सुरुवात करून देताना सारस्वत प्रकाशन या संस्थेच्या उपक्रमांबद्दल विस्तृत माहिती दिली. सारस्वत परिचय ग्रंथाबद्दल साखळकरांनी उपयुक्त विश्लेषण करत सर्वांना संग्रही ठेवण्याचे आवाहनही केले.

गौरव सोहळ्याची सुरुवात करताना सारस्वत प्रकाशनचे अध्यक्ष दिलीप भिसे यांनी प्रमुख पाहुणे, विशेष अतिथींचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. तर 'गोवा सारस्वत समाजा'चे अध्यक्ष जगन्नाथ उर्फ देश प्रभूदेसाई यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त व सारस्वत चैतन्याचे संपादक सुधाकर लोटलीकर यांनी केला. व्यासपीठावरील मान्यवरांना 'सारस्वत परिचय' हा ग्रंथही भेट देण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून नामवंत पत्रकार, संपादक व गोव्यातील प्रतिष्ठित सारस्वत वामन प्रभू यांच्या 'ऑफ द रेकॉर्ड - मनोहर पर्रिकर, अनप्लगड' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्ष दिलीप भिसे यांनी सारस्वत बँकेचे संचालक सौदागर व विशेष अतिथी दिगंबर कामत यांचाही शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागतपर सत्कार केला.

आपल्या मनोगतात गोवा सारस्वत समाजाचे सर्वेसर्वा देश प्रभुदेसाई यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करत गौरव सोहळ्याच्या संकल्पना व आयोजनाबद्दल 'सारस्वत प्रकाशन, मुंबई' या संस्थेबद्दल गौरवोद्गार काढले. गोवेकर सारस्वतांच्या गौरव व त्यांच्या कार्याबद्दल एका मुंबईच्या संस्थेला असलेली तळमळ, या विचारांनीच मला संयुक्त आयोजनाला प्रेरित केले, असे ते आपल्या मनोगतात म्हणाले. सर्व जमलेल्या श्रोत्यांचे त्यांनी आभार मानले आणि गोवा सारस्वत समाज सर्व सारस्वतांसाठी सदैव कार्यरत राहील, याची ग्वाहीही दिली.

यावेळी पुढील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान सारस्वत व्यक्तींना पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

श्री. शेखर रवींद्र सरदेसाई (उद्योग/व्यवसायातील योगदान - सारस्वत प्रकाशन पुरस्कार.)

श्री. केशव (राजू) मेघश्याम नायक (समाजिक कार्यातील योगदान - समाजसेवक कै. रवींद्र पाटकर स्मृती पुरस्कार.)

श्री. नितीन कुंकळीकर (उद्योग, शिक्षण क्षेत्रातील नेतृत्व व समन्वय - कै. सौ. प्रमोदिनी व कै. डॉ. प्रभाकर वा. रेगे स्मृती पुरस्कार.)

डॉ. प्रदीप बोरकर (वैद्यकीय, कला व संगीत क्षेत्रातील योगदान - कै. एम. एन. देसाई स्मृती पुरस्कार.)

श्री. रामनाथ पै रायकर (पत्रकारितेतील योगदान - कै. गोविंद मंगेश लाड स्मृती पुरस्कार.)

अॅड. प्रकाश श्रीरंग प्रभुदेसाई (विधी व सामाजिक कार्यातील योगदान - सारस्वत प्रकाशन विशेष सत्कार.)

श्री. शाणू आत्माराम पै पाणंदीकर (सामाजिक कार्यातील योगदान - सारस्वत प्रकाशन विशेष सत्कार.)

सारस्वत विद्यालय (शैक्षणिक संस्था - कै. व्ही. डी. पाडगांवकर स्मृती पुरस्कार.) या शंभर वर्षे पूर्ण केलेल्या शैक्षणिक संस्थेस आणि कु. पूर्ती अमेय लोटलीकर (क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी - कै. एन. व्ही. गुंजीकर विशेष गुणवत्ता पारितोषिक) या विद्यार्थिनीस पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी सर्व मानकऱ्यांचा गौरव टाळ्यांच्या प्रचंड गजरात व भावपूर्ण वातावरणात पार पडला.

विशेष अतिथी, माजी मुख्यमंत्री व मडगावचे विद्यमान आमदार दिगंबर कामत यांनी आपले मार्गदर्शनरूपी मनोगत व्यक्त केले. गोव्यातील सारस्वतांच्या विशेष गौरव सोहळ्याची संकल्पना व आयोजन प्रथमच मुंबईच्या सारस्वत प्रकाशन या संस्थेने केल्याबद्दल अध्यक्ष दिलीप भिसे यांचे मनापासून कौतुक व विशेष आभार मानले. मठग्रामाच्या नगरीत सादर होणाऱ्या गौरव सोहळ्याचे आयोजन केल्याबद्दल आपल्याला अभिमान वाटतो, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. सारस्वत समाज हा शिक्षित, सुजाण व सुकृत्य करणारा समाज असून सर्व तळागाळाच्या समाजाची वृद्धी करण्याची जबाबदारी सारस्वतांवर असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पर्तगाळ मठाच्या स्वामींच्या उपदेशाची त्यांनी वाच्यता करताना सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन जाणे आणि गरजूंना मदतीचा हात देण्याचे आवाहनही त्यांनी केले. त्याचबरोबर सारस्वत चेंबर्ससारखा उपक्रम सारस्वत समाजातील उद्योजकांना गती देणारा असल्याचे त्यांनी विशेष नमूद केले. सिद्धार्थ सिनकर, प्रवीण काकोडे यांच्या 'सारस्वत चेंबर ऑफ कॉमर्स' सुरू करण्याच्या संकल्पनेचेही त्यांनी स्वागत केले. चेंबरमुळे समाजातील तरुणांना त्यांच्या करिअरला आकार देण्यास मदत होईल असेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना विशेष अतिथी, आमदार दिगंबर कामत म्हणाले, "सारस्वत समाजाला इतरांचे जीवनमान उंचावण्याची परंपरा आहे. त्यामुळे समाजातील गरजूंना मदत करताना समाजाच्या नेत्यांनी समाजाबाहेरील इतरांनाही मदतीचा हात दिला पाहिजे."

गौरव सोहळ्याचे प्रमुख पाहुणे, नामदार रोहन खंवटे यांनी सर्व गौरवमूर्तींचा सत्कार व विशेष अभिनंदन आपल्या भाषणात व्यक्त केले. आपलं मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, "यश मिळविलेल्या सारस्वतांच्या प्रेरणादायी कथा जगासमोर घेऊन जाणे गरजेचे आहे!" ते पुढे असेही म्हणाले की, "सारस्वत समाजात बुद्धी आणि पैशाची कमतरता नाही. मात्र संधी निर्माण झाल्या पाहिजेत. समाजाच्या कल्याणासाठी हेवेदावे बाजूला



सारून एकसंघ होण्याची गरज आहे. सारस्वत समाजाने आपल्या संस्कृतीकडे दुर्लक्ष करू नये.”

परशुराम भूमीला पुन्हा वैभवाने साकारण्याची गरज आहे. गोव्याचे समुद्र व सूर्य पर्यटकांचे आकर्षण म्हणून सतत प्रचार करण्यापासून दूर गेले पाहिजे. आता धार्मिक आणि आध्यात्मिक संस्कृतीसह आपल्या संस्कृतीचा प्रसार करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सारस्वत मेळाव्यासारख्या कार्यक्रमामुळे समाजातील सदस्यांशी संवाद साधण्याची संधी मिळते.

'सारस्वत प्रकाशन मुंबई' या संस्थेच्या पंच मंडळींनी गौरव पुरस्कारासाठी अतियोग्य निवड केल्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. गौरव केल्याने कार्याची उत्तम पोचपावती मिळते; परंतु त्याचबरोबर त्या क्षेत्रातील कामाचा उत्साह व प्रेरणा वाढविण्यास मदत होते, असे विचार त्यांनी मांडले.

गोवा सारस्वत गौरवमूर्तींच्या प्रेरणादायक वाटचालींचा पुढील पिढीस योग्य मार्गदर्शनासाठी व वसा जपण्यासाठी डिजिटल संग्रह जोपासण्याचा व जगासमोर नेण्याचा संकेत त्यांनी व्यक्त केला. सारस्वत समाजाने एकमेकांच्या प्रगतीपथावर मदतीची साखळी तयार करावयास हवी. एकमेकांची उणी-दुणी काढण्याऐवजी समाजातील उणीव भरून काढण्याचे आवाहन त्यांनी व्यासपीठावरील मान्यवर व उपस्थित प्रेक्षकांना केले.

गुजराथी-पारसी समाजाच्या एकंदरीत औद्योगिक प्रगतीचा आणि त्या दोन्ही समाजातील एकमेकांना होणाऱ्या साहाय्याचा आदर्श, सारस्वत समाजाने निरखून त्याचा अवलंब करावा आणि सारस्वत उद्योजकतेला उभारी द्यावी, असे विचार त्यांनी व्यक्त केले. या अनुषंगाने आधारित सारस्वत चेंबर्स या उपक्रमाचे विशेष कौतुक करत 'उत्तम योजना' हा शाबासकीचा आहेरही दिला. गोव्यात सारस्वत समाजाचा सदैव गौरव व्हावा व त्यासाठी लागणाऱ्या सर्वतोपरी मदतीचे आश्वासन त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. संस्कृतीचा वसा, परंपरांचा सन्मान व सामाजिक बांधिलकीचा समन्वय राखण्याचा मौलिक सल्ला देऊन त्यांनी आपले भाषण समाप्त केले. याच समारंभात सारस्वत चैतन्य दिवाळी अंकातील कथा - काव्य स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकानां पारितोषिक प्रदान करण्यात आले. सारस्वत प्रकाशनाचे अध्यक्ष दिलीप भिसे यांनी सरतेशेवटी मांडलेल्या मनोगतात सारस्वत प्रकाशन, सारस्वत समाज, सारस्वतांची आद्यभूमी गोवा व सारस्वतांच्या प्रगतीचा आलेख याचा विशेष उल्लेख केला. दिलीप भिसे म्हणाले, “सर्व सारस्वतांचे पूर्वज मुळचे गोव्यातील होते. मात्र अनेक समाज बांधव अनेक कारणांमुळे गोव्यातून बाहेर गेले. तरीही त्यांनी त्यांच्या नवीन ठिकाणांच्या विकासात भरीव योगदान दिले आहे.”

गौरव सोहळ्याच्या संयुक्त नियोजनाची जबाबदारी व सादरीकरण उत्तमरीत्या पार पाडल्याबद्दल गोवा सारस्वत समाजाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे त्यांनी विशेष आभार मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी 'गोवा सारस्वत समाजा'तर्फे नवनाथ खांडेपारकर यांची आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती, तर राजेश प्रभू हे कार्यक्रम समन्वयक होते. 'सारस्वत प्रकाशन'तर्फे विश्वस्त मुयरेश पाडगांवकर हे समन्वयक होते.

शेरोशायरी व कवितांचा वापर करून गोवेकरांना मंत्रमुग्ध करणारे निवेदक प्रसाद कुलकर्णी व आयोजनात समन्वयाची यशस्वी भूमिका बजावणारे मयुरेश पाडगांवकर यांचा देश प्रभूदेसाई यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

कोकणी भाषेवर प्रभुत्व असलेल्या निवेदिका स्मिता संझगिरी, आयोजन समन्वयक नवनाथ खांडेपारकर, तसेच समन्वयासाठी सहकार्य करणाऱ्या विणा नाडकर्णी यांचा सन्मान दिलीप भिसे यांनी केला.

सर्व मनोगते व्यक्त झाल्यानंतर सारस्वत प्रकाशनचे कार्याध्यक्ष राजन देसाई यांनी आभार प्रदर्शन सादर केले. या गौरव सोहळ्यासाठी मुंबई, गोवा, बेळगाव, कोल्हापूर, कुडाळ; तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमधील सारस्वत संस्थांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

या कार्यक्रमास मुख्य प्रायोजक म्हणून सारस्वत बँकेचे व सहप्रयोजक म्हणून सुप्रिया लाईफसायन्स लि. व एन. के. जी. एस. बी. बँकेचे बहुमूल्य योगदान लाभले होते.

सर्व श्रोते, मान्यवर, गौरवमूर्ती यांच्या सहभोजनानंतर २३वा सारस्वत चैतन्य गौरव सोहळा संपन्न झाला.

***

# 'सारस्वत चैतन्य गौरव सोहळा २०२३' मधील उपस्थित पाहुणे आणि पुरस्कर्त्यांचा थोडक्यात परिचय




### प्रमुख पाहुणे – रोहन खंवटे

मुळात इंजिनीयर असलेले रोहन खंवटे आधी उद्योग व्यावसायिक आणि त्यानंतर राजकीय क्षेत्राकडे वळले. उद्योग क्षेत्रातील कामगिरीकरता २००३ मध्ये गोव्याचे तत्कालीन राज्यपाल केदारनाथ शहा यांच्या हस्ते 'यंग इंटरप्रेनर्स अवॉर्ड'ने त्यांना सन्मानित करण्यात आले. ते स्वतः उत्तम खेळाडू आहेत. क्रिकेट आणि बास्केटबॉल या खेळांमध्ये त्यांनी गोवा राज्याचे प्रतिनिधित्व केले आहे.

पर्यटन मंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या पर्यटन उद्योगाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला असून गोवा म्हणजे फक्त मौजमजा आणि नाईट लाईफ ही प्रतिमा बदलून टाकून गोव्याचे सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक पैलू त्यांनी जगासमोर आणले आहेत.

दूरदृष्टी आणि धडाडी असलेला आणि गोव्याच्या विकासाकरता कटिबद्ध असलेला हा नेता तेविसाव्या सारस्वत गौरव पुरस्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणा म्हणून लाभला.

---




### विशेष अतिथी – दिगंबर कामत

दिगंबर कामत हे गोमंतकातील ज्येष्ठ राजकीय नेते असून २००७ ते २०१२ या काळात ते गोव्याचे मुख्यमंत्री होते. गोव्याच्या मंत्रिमंडळात विविध खात्यांची मंत्रिपदे त्यांनी भूषवली आहेत.

मडगाव विधानसभा मतदार संघातून सलग आठ वेळा निवडून येण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. जनतेच्या अडीअडचणीला मदत करण्यात सदैव तत्पर असलेले दिगंबर कामत हे त्यांच्या मतदार संघात लोकप्रिय आहेत.

अनेक सामाजिक संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा सहभाग आहे.



## ॲड प्रकाश श्रीरंग प्रभुदेसाई

**सारस्वत प्रकाशनतर्फे विशेष सत्कार**

मुंबई युनिव्हर्सिटीमधून एल.एल.एम.ची पदवी घेऊन त्यांनी वकिली व्यवसायात पदार्पण केले. कायद्याच्या आधारे अनेक पीडितांच्या, वंचितांच्या अन्यायाला वाचा फोडली. व्यक्तिगत किंवा संस्थात्मक स्तरांवर अनेकांना न्याय मिळवून दिला. वकिली हा केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे आणि न्यायदानाचे साधन आहे, याचे भान ठेवून गेली पाच दशके ते वकिली व्यवसाय करत आहेत.

वकिली क्षेत्राबरोबरच अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक संस्थांशी त्यांचे निकटचे संबंध आहेत. ‘मनोविकास संस्था, मडगाव’ या संस्थेचे ते विश्वस्त आहेत. ‘शारदा सेवा प्रतिष्ठान’चे ते संस्थापक आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्थापन केलेल्या ‘शारदाश्रय’ या संस्थेचे ते संस्थापक आहेत.

## शानू पै पाणंदीकर

**सारस्वत प्रकाशनतर्फे विशेष सत्कार**

मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्रातील उच्चपदवी प्राप्त केलेल्या शाणू यांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला असून मारपोल या पावडर कोटींग क्षेत्रातील नामवंत आस्थापनेचे ते व्यवस्थापकीय संचालक होते. त्या व्यतिरिक्त वडिलोपार्जित शेती, भात आणि पीठ उद्योगातही त्यांनी काम केले.

कवळे येथील प्रसिद्ध शांतादुर्गा देवस्थानचे ते अध्यक्ष होते. त्याशिवाय ‘लायन्स क्लब, मडगाव’ आणि ‘विद्या विकास प्रतिष्ठान’ या गोमंतकातील प्रसिद्ध शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून त्यांनी भरीव सामाजिक कार्य केले आहे.





## डॉ. जगन्नाथ उर्फ देश प्रभुदेसाई

देश प्रभुदेसाई हे ‘गोवा सारस्वत समाजा’चे अध्यक्ष, व्यवसायाने होमिओपॅथिक फिजिशियन असून अनेक सामाजिक कार्यक्रमांत त्यांचा सहभाग असतो.

डॉ. प्रभूदेसाई हे ‘अर्बन अल्केमी हॉटेल अँड हॉस्पिटॅलिटी’चे पार्टनर आहेत.

विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांचे ते पदाधिकारीही आहेत. श्री. जगन्नाथ प्रभुदेसाई यांचे वडील डॉ. मनमोहन प्रभुदेसाई हे आजारी असल्याने तसेच श्री. सुहास सरदेसाई हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे येऊ न शकल्याने सारस्वत प्रकाशनच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला आणि शुभेच्छा दिल्या.

### केशव उर्फ राजू मेघश्याम नायक

**‘समाजसेवक रवींद्र पाटकर स्मृती पुरस्कारा’ने सन्मानित.**

लहान थोरांत राजू या नावाने परिचित असलेल्या नायक यांची उत्कृष्ट नाट्य कलाकार आणि दिग्दर्शक म्हणून ख्याती आहे. सेवाभावी समाजसेवी असा वारसा असलेल्या घराण्यात त्यांचा जन्म झाला. कला अकादमी गोव्याच्या नाट्य स्पर्धेत उत्कृष्ट नाटके सादर करून त्यांनी सातत्याने अव्वल बक्षिसे प्राप्त केली आहेत.

त्यांनी चित्रपटातील छोट्या-मोठ्या अशा अनेक भूमिका साकार केल्या आहेत. ‘संकल्प थिएटर्स’ या नाटककलेला उत्तेजन देणाऱ्या आणि नवनवीन कलाकार घडवणाऱ्या नाट्यसंस्थेचे ते संस्थापक आहेत. या संस्थेच्या माध्यमातून गेली तेवीस वर्षे ते ‘दहा दिवसीय अखिल गोवा कोकणी नाट्य महोत्सवा’चे दरवर्षी यशस्वी आयोजन करत असतात.

सध्या दिव्यांग मुलांसाठी अद्ययावत सोयीसुविधा असलेली शाळा उभारण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत.





### डॉ. प्रदीप बोरकर

**एम. एन. देसाई स्मृती पुरस्काराने सन्मानित**

वैद्यकीय व संगीत क्षेत्रातील योगदानासाठी डॉ. बोरकर यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. गेली पन्नास वर्षे वास्को येथे मेडिकल प्रॅक्टिशनर असलेले डॉ. बोरकर १९८० पासून भारतीय शास्त्रीय संगीत आणि संगीत नाटके याकरता काम करत आहेत.

एकूण १७ अशा विविध अभिजात संगीत मराठी नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले आहे व त्यात मुख्य भूमिकाही केल्या आहेत. त्या व्यतिरिक्त सात नाटकांचा मराठीतून कोकणी भाषेत अनुवादही केला आहे; शिवाय त्यात कामदेखील केले आहे.  संपूर्ण गोवा राज्यात या नाटकांचे प्रयोग झालेले आहेत.

संगीत सौभद्र, संगीत एकच प्याला, लग्नाची बेडी, वासूची सासू, झोपी गेलेला जागा झाला, दिनूच्या सासूबाई राधाबाई, अंमलदार ही यांपैकी काही ठळक नावे. त्या व्यतिरिक्त ते उत्कृष्ट हौशी चित्रकार आहेत. ऑइल आणि ॲक्रेलिक रंगात काढलेली त्यांची व्यक्तिचित्रे प्रसिद्ध आहेत.

## शेखर रवींद्र सरदेसाई

### उद्योग व्यवसायातील योगदानाकरता दिला जाणारा सारस्वत प्रकाशन पुरस्कार

शेखर सरदेसाई हे 'किनेको उद्योग समूहा'चे संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. १९९५ मध्ये त्यांनी या उद्योगाची स्थापना केली. त्याआधी आठ वर्षे त्यांनी अनेक जागतिक दर्जाच्या आणि निर्मिती उत्पादन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, प्रॉडक्ट डेव्हलपमेंट, मार्केटिंग आदी क्षेत्रांचा अनुभव घेतला.

एरोस्पेस, संरक्षण, रेल्वे, टेलिकॉम, विंड एनर्जी अशा क्षेत्रांमध्ये लागणाऱ्या कंपोझिट प्रॉडक्ट आणि सबसिस्टिमची निर्मिती या समूहातर्फे करण्यात येते. 'पिळणे इंडस्ट्रियल इस्टेट'मध्ये ३३००० स्क्वेअर मीटर जागेवर हा उद्योग समूह पसरलेला आहे. त्या व्यतिरिक्त चेन्नई, लखनौ आणि पंजाब या ठिकाणी समूहाच्या ओन साईट असेंबली फॅसिलिटी आहेत.

या समूहात एक हजारहून अधिक कर्मचारी काम करत असून या उद्योगसमूहाचे ३० टक्क्यांहून अधिक उत्पादन अमेरिका युरोप आणि मध्य आखातातील देशांना निर्यात केले जाते. व्यवसायाव्यतिरिक्त सामाजिक उपक्रमातही सरदेसाई यांचे योगदान आहे. गोवा राज्य औद्योगिक समितीचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे. 'सीआयआय गोवा




कौन्सिल'चे ते चेअरमन होते. त्याशिवाय 'गोवा राज्य प्रदूषण नियामक मंडळा'चे ते सदस्य होते. गोवा राज्य गुंतवणूक प्रमोशन मंडळ, गोवा राज्य इन्व्हेस्टमेंट प्रमोशन बोर्ड, गोवा आयडीसी बोर्ड या संस्थांच्या माध्यमातून गोव्याच्या औद्योगिक विकासाकरता त्यांनी काम केले आहे. शेखर यांना या आधीही अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

---

## रामनाथ पै रायकर

### पत्रकारितेतील दीर्घकालीन योगदानाकरता दिल्या जाणाऱ्या 'गोविंद मंगेश लाड स्मृती पुरस्कारा'ने सन्मानित

रामनाथ पै रायकर हे गोव्याच्या 'नवहिंद टाइम्स' या इंग्रजी दैनिकात साहाय्यक संपादक म्हणून काम करतात. मेकॅनिकल आणि कॉम्प्युटर इंजिनीअरिंगमधील शिक्षण घेतलेले रामनाथ यांनी पत्रकारिता हा व्यवसाय म्हणून स्वीकारला. 'गोमंतक' या मराठी दैनिकातून त्यांनी आपली कारकीर्द सुरू केली. आणि त्यानंतर इंग्रजी वर्तमानपत्र सृष्टीत प्रवेश केला.

रायकर हे चित्रपट विषयातले संशोधक असून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांवर त्यांनी विस्तृत लेखन केलेले आहे. गोव्यामध्ये झालेले आतापर्यंतचे सर्वच्या सर्व म्हणजे १७ आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल कव्हर करण्याचा मान त्यांना मिळाला आहे. विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या मुलाखती घेण्याची संधी त्यांना मिळाली आहे. यामध्ये लता मंगेशकर, आशा भोसले, देव आनंद, कमल हसन, नंदन नीलेकणी, मनोहर पर्रीकर, के. श्रीकांत, आर. के. लक्ष्मण, मारिओ मिरंडा ही त्यातली काही वानगीदाखल नावे. गोमंतक




मराठी अकादमी, गोवा मराठी अकादमी, गोवा कोकणी अकादमी, कला आणि संस्कृती संचालनालय गोवा अशा विविध संस्थांतर्फे त्यांना याआधीही सन्मानित करण्यात आले आहे.

## पूर्ती अमेय लोटलीकर

**क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीकरता दिले जाणारे एन. व्ही. गुंजीकर विशेष गुणवत्ता पारितोषिक**

पूर्तीने 'ज्यूडो' या क्रीडा प्रकारात विशेष प्रावीण्य मिळवलेले आहे. ती सध्या तेरा वर्षांची असून वयाच्या पाचव्या वर्षापासून तिने ज्यूडो शिकायला सुरुवात केली.

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये २०२० पासून सलग तीन वर्षे तिने सर्व स्तरांवर सुवर्ण पदके मिळवण्याचा विक्रम केला आहे. 'गोवा ज्यूडो असोसिएशन'तर्फे गतवर्षी आयोजित करण्यात आलेल्या 'ज्युनिअर स्टेट ज्यूडो चम्पियनशिप स्पर्धे'त तिला सुवर्ण पदक आणि ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले होते. ज्यूडो व्यतिरिक्त योगासनांमध्येही तिने प्रावीण्य मिळवले आहे.




## सारस्वत विद्यालय, गोवा

**समाजसेवक कै. व्ही. डी. पाडगावकर स्मृती पुरस्काराने सन्मानित**

सारस्वत विद्यालय, गोवा ही गोमंतकातली एक जुनी आणि नामांकित शैक्षणिक संस्था आहे. गोव्याच्या स्वातंत्र्यपूर्वकाळात स्वातंत्र्य आणि सामाजिक उत्तरदायित्व आणि त्याबरोबरच गोव्याचा सर्वांगीण विकास या विचारांनी प्रेरित होऊन काही समाजधुरीणांनी एकत्र येऊन दोन मार्च १९११ रोजी या संस्थेची स्थापना केली. ११२ वर्षांपूर्वी लावलेल्या या छोट्याशा रोपट्याचे रूपांतर आज विशाल वटवृक्षात झालेले आहे.

या संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन आणि व्होकेशनल इन्स्टिट्यूट अशा विविध शाखा आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढीची आवश्यकता लक्षात घेऊन संस्थेने १९८६ साली 'स्वर श्रृंगार संगीत अकादमी'ची स्थापना केली. १९८८ पासून संस्थेने व्होकेशनल कोर्सेस सुरू केले असून यामध्ये ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग, ऑफिस सेक्रेटरीशिप, अकाउंटन्सी, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी इत्यादी विषयांचा समावेश होतो.

त्या व्यतिरिक्त व्यवस्थापन क्षेत्रातील अध्ययनाकरता संस्थेने 'इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड ह्युमन रिसर्च डेव्हलपमेंट'चीदेखील स्थापना केली आहे.



## नितीन कुंकोळ्ळीकर

### उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील नेतृत्व आणि समन्वय याकरता कै. सौ. प्रमोदिनी आणि कै. डॉ. प्रभाकर वा. रेगे स्मृती पुरस्काराने सन्मानित



नितीन कुंकोळ्ळीकर हे नाव शासकीय समित्या, विविध आस्थापना, शिक्षण, सामाजिक संस्था, एनजीओ अशा विविध क्षेत्रांशी एकाच वेळी संबंधित आहे. केंद्रीय आणि राज्यस्तरावरील विविध शासकीय योजनांच्या आरेखनात त्यांची महत्त्वाची भूमिका असते.

आपल्या कर्तृत्वाने त्यांनी जबाबदारीची विविध पदे भूषवली आहेत. 'मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी, दिल्ली' या संस्थेचे ते मानद अध्यक्ष होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी या संस्थेला अधिक उंचीवर नेऊन ठेवले. 'नॅशनल एक्झिक्युटिव्ह कौन्सिल ऑफ सीआयआय'चे ते सदस्य होते, तर 'ॲसोकॅम' या संस्थेचे सध्या ते सदस्य आहेत. त्या व्यतिरिक्त 'वेरणा इंडस्ट्रीज असोसिएशन' या संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत.

'गोवा चेंबर ऑफ कॉमर्स'चे अध्यक्षपद त्यांनी सातत्याने म्हणजे तीन वेळा भूषवले आहे. हा बहुमान मिळवणारे ते आतापर्यंतचे सर्वात तरुण व्यक्ती ठरले आहेत. त्या व्यतिरिक्त विविध कंपन्यांच्या संचालक मंडळावरदेखील ते आहेत. 'इंटरनॅशनल सेंटर ऑफ गोवा'चे विश्वस्त असून विविध शासकीय संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील संवादाची आणि समन्वयाची भूमिका ते मोठ्या कौशल्याने पार पाडतात.

नितीन कुंकोळ्ळीकर यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 'इकॉनॉमिक ग्रुप सोसायटी ऑफ इंडिया'तर्फे दिला जाणारा २०२३चा 'नॅशनल बिझनेस लीडरशिप पुरस्कार' हा त्यातला एक महत्त्वाचा पुरस्कार होय.

सीएनबीसी, टाइम्स नाऊ, झी टीव्ही आदी राष्ट्रीय वाहिन्यांवर पॅनललिस्ट म्हणून त्यांना निमंत्रित करण्यात येते. २०१४ आणि २०१५ मध्ये लागोपाठ दोन वर्षे 'दिल्ली इकॉनॉमिक कन्क्लेव्ह'मध्ये त्यांना पॅनललिस्ट आणि की नोट स्पीकर म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.



**विजय सरदेसाई यांच्या समवेत...**

सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी

स्थापना १९०२

॥ ज्ञानमयो भव ॥

# Saraswat
## Vidyarthi Sahayak Mandali

- **Educational Scholarships and Loan Scholarships to the Needy and Bright students of Saraswat Community.**
- **Scholarships given to Students of Schools, Graduation and Post-Graduation courses.**
- **Loan Scholarships for Post-Graduation courses abroad.**

**Office :**

**Chikitsak Samuha Bhavan,**
1st Floor, 52, Sadashiv Cross Lane,
Khadilkar Marg, Girgaum, Mumbai -4.

**Balwant Madgaonkar Student Hostel,**
Court Lane, Borivali (West),
Mumbai 400 092.

**Tel : 022-2386 9167**

**Mobile : 91369 39469 / 72086 09659**

**Mail : svsm1902@gmail.com**

**Website : www.svsmandali.in**

**Link : https://www.scholarships.svsmandali.in/login.php**

# सारस्वत हितवर्धक मंडळाचा दिमाखदार शतकमहोत्सवी पदार्पण सोहळा संपन्न

## ज्ञाती म्हणजे संस्कृती, अस्मिता म्हणजे मानवता ! - डॉ. आनंद नाडकर्णी




'ज्ञाती म्हणजे संस्कृती असते आणि अस्मिता म्हणजे मानवता असते, या दृष्टीकोनातून प्रत्येकाने पाहिले, तर जातीयता दिसणार नाही!', असे मत सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी येथे व्यक्त केले. ते 'सारस्वत हितवर्धक मंडळ' या भालावलीकर 'गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञाती संस्थे'च्या शतकमहोत्सवी वर्ष पदार्पण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कवी, गीतकार श्री. गुरु ठाकूर उपस्थित होते.

हा सोहळा शनिवार, ४ नोव्हेंबर २०२३ रोजी बी. एन. वैद्य सभागृह, राजा शिवाजी विद्यालय संकुल, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४ येथे संपन्न झाला.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मुख्य सोहळ्यास सुरुवात झाली. सुप्रसिद्ध निवेदिका मंगला खाडिलकर यांनी व्यासपीठावरील मान्यवर व सभागृहातील उपस्थित ज्ञाती बंधुभगिनींचे स्वागत केले. मंडळाचे कार्यवाह दीपक मुळ्ये यांनी प्रास्ताविक केले.

प्रास्ताविकात त्यांनी प्रथम शंभर वर्षांपूर्वी ज्या आपल्या महनीय पूर्वजांनी ही संस्था स्थापन केली, त्यांना विनम्र अभिवादन केले. त्यानंतर मंडळाच्या आजवरील कार्याचा




थोडक्यात आढावा घेतला. ते म्हणाले, 'आमच्या संस्थेतर्फे ज्ञातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविले जाते. निराधारांना असाहाय्य मदत, वैद्यकीय मदत केली जाते. कोकणातील काही शाळांमधील सारस्वत नसलेल्या, परंतु गरजू असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिले जातात.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळांची उणीव आहे, हे लक्षात घेऊन पुणे येथील 'विज्ञान वाहिनी'च्या सहकार्याने कोकणातील काही शाळांमधील विज्ञान शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञानाचे प्रयोग' या विषयावर प्रात्यक्षिकांसह व्याख्याने आयोजित केली जातात. सर्व जातीधर्मांच्या गरजूंसाठी मोफत चष्मेवाटप व आरोग्य शिबिर आयोजित केले जाते.

त्यानंतर मानसोपचार तज्ज्ञ, साहित्यिक, समाजसेवक डॉ. आनंद नाडकर्णी यांचा; तसेच विशेष अतिथी सुप्रसिद्ध कवी, गीतकार गुरू ठाकूर यांचा परिचय मंगला खाडिलकर यांनी करून दिला.

डॉ. नाडकर्णी यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ सिनकर यांनी सत्कार केला, तर विशेष अतिथी सुप्रसिद्ध कवी, गीतकार गुरू ठाकूर यांचा सत्कार मंडळाचे विश्वस्त रमेशचंद्र रघुनाथ तेंडुलकर यांनी केला.

यावेळी समाजकार्यातील योगदानाबद्दल सर्वश्री शशिकांत एकनाथ तेंडुलकर, डॉ. वामन शांताराम खटकूळ, डॉ. पां. रा. किनरे, भालचंद्र गंगाधर वाकडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. गौरवमूर्तींना मंडळाच्या वतीने मानपत्र देण्यात आले. तसेच यावेळी सभागृहात उपस्थित असलेले मान्यवर सर्वश्री सारस्वत बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक किशोर रांगणेकर, प्रसिद्ध उद्योजक आरेक्स लॅबोरेटरीचे अजित गुंजीकर, सीए मंगेश किनरे, महिला उद्योजिका सरोज स्वीट्च्या मनिषा मराठे, एन. के. जी. एस. बी. बँकेचे संचालक प्रवीण रेगे, विज्ञान वाहिनी पुणे यांचे प्रतिनिधी विवेक एरंडे आणि सुरेश नेरुणकर यांना व्यासपीठावरील महनीय व्यक्तींच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. पां. रा. किनरे यांनी मंडळाला एक लाख रुपये देणगी जाहीर केली.

डॉ. नाडकर्णी आपल्या भाषणात म्हणाले, 'सारस्वत ज्ञाती हीसुद्धा एक संस्कृती आहे. जी सारस्वत मुलगी आंतरजातीय विवाह करून अन्य जातीत जाते, तेव्हा ती त्यांची संस्कृती स्वीकारते; पण सारस्वत संस्कारही विसरत नाही. तसेच एखादी अन्य जातीतील मुलगी सारस्वत घराण्यात येते, तेव्हा ती सारस्वत होऊन जाते. हे सर्व संस्कारातून होत असते. शंभर वर्षांपूर्वी या संस्थेची स्थापना झाली, त्यावेळच्या धुरिणांची दृष्टी किती व्यापक होती, हे यावरून लक्षात येते. सहकारातून सहयोगाकडे जाऊ या, हेच ध्येय त्यांनी ठेवले असावे. ज्ञातीची अस्मिता असावी, पण ही अस्मिता कुंपण तोडणारी हवी आणि माणसे जोडणारी असावी.'

विशेष अतिथी गुरू ठाकूर म्हणाले की, 'दहा मराठी माणसे एकत्र आली, की संस्था स्थापन करतात. मग दहा डोक्यातून दहा विचार उगम पावतात. एकमेकांचा ताळमेळ बसत नाही आणि संस्था बंद पडते. मात्र या संस्थेची कथाच वेगळी आहे. एका विचारांची दहा माणसे एकत्र आली. दहा माणसांचे वीस हात झाले. वीस हातांनी एकत्र काम केले. आणि संस्था चालवली. पुढे चार संस्थांची माणसे एकत्र आली. त्यांनी आपल्या संस्था विसर्जित करून ही एक नवीन 'सारस्वत हितवर्धक मंडळ' संस्था स्थापन केली. तीच संस्था ९९ वर्षे पूर्ण करून शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. ९९ वर्षांत या संस्थेने समाजासाठी भरपूर कार्य केले आहे. मी येथून जाताना ज्ञानाचे कण घेऊन जाणार आहे.'

मुख्य सोहळ्याला सुरुवात होण्यापूर्वी साडेचार ते सहा या वेळेत 'सारस्वताचे लेणे' हा सारस्वत गीतकार, संगीतकार यांच्या लोकप्रिय झालेल्या गीतांचा कार्यक्रम




सादर करण्यात आला. गायक मंदार आपटे, धनंजय म्हैसकर, रसिका गानू यांनी सुरेल आवाजात गाणी सादर केली. या कार्यक्रमाचे आयोजन व निवेदन श्रेयसी मंत्रवादी यांनी केले होते. संगीत संयोजन प्रशांत लळित यांचे होते.

या संगीताच्या कार्यक्रमात श्रोतृवृंद मंत्रमुग्ध झाला होता. या कलाकारांचा सत्कार व्यवस्थापक मंडळाचे उपाध्यक्ष सुहास पोतकर, खजिनदार उल्हास साखळकर, सदस्य सुचित कावतकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या निवेदिका मंगला खाडिलकर व संगीताचा कार्यक्रम सादर करणाऱ्या निवेदिका श्रेयसी वझे यांचाही व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या शतकमहोत्सव पदार्पण सोहळ्याला सारस्वत समाजातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर, तसेच अनेक सारस्वत संस्थांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

हा समारंभ सारस्वत बँकेने पुरस्कृत केला होता. मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ सिनकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी मंडळाच्या भावी वाटचालीची दिशा स्पष्ट केली. राहुल साखळकर यांनी आभारप्रदर्शन केले.



# सारस्वत हितवर्धक मंडळ शतक महोत्सव कार्यक्रम मालिका - मूळस्थानी भालावली येथे पवमान स्वाहाकार अर्थात विष्णूयाग



सारस्वत हितवर्धक मंडळाचा शतक महोत्सवी वर्षातील पदार्पण सोहळा दि. ४ नोव्हेंबर २०२३ ला मुंबईत भालावलीकर व इतर सारस्वतांच्या भरघोस उपस्थितीत उत्साही वातावरणात संपन्न झाला.

देवाने दिलेल्या आयुष्याबद्दल कृतज्ञता बाळगणे व त्याच्या कृपा प्रसादासाठी अनुष्ठाने करणे हा आपल्या अभिमानास्पद वैदिक धर्म परंपरेचा अविभाज्य घटक आहे; हे ध्यानी घेऊन समाज बांधवांच्या सौख्यासाठी व ह्या शतक महोत्सवाचा पुढचा भाग म्हणून भालावलीकरांच्या मूळस्थानी भालावली येथे श्री लक्ष्मी माधव मंदिरात पवमान स्वाहाकार -विष्णू याग शनिवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी , श्री गोपाळ पाध्ये गुरुजी ह्यांच्या पौरोहित्याखाली यथासांग पार पडला. गुरुजींनी अनुष्ठानाचे विधी, संकल्प व गाऱ्हाणे सर्व उपस्थितांना समजेल, त्याचा आशय नि महत्त्व सर्वांच्या ध्यानी येईल ह्याची दक्षता घेतली त्यामुळे सर्वांना अनुष्ठानात सहभागी झाल्याचा आनंद मिळाला.

ऋग्वेदातल्या ९ व्या मंडळात पुरुष सूक्त, उत्तर नारायणीय सूक्त, पवमान सोम सूक्त, विष्णू सूक्त आणि उत्तर अध्याय ह्यांचा समावेश असलेले हे पवमान पंचसूक्त आहे. पारायण, अभिषेक व अग्नी स्वाहाकार अशा विविध पद्धतीने हे वैदिक अनुष्ठान केले जाते. पारायणानंतर (अग्नी) स्वाहाकार केला तर त्याला पवमान स्वाहाकार वा विष्णू याग म्हटले जाते. ह्या अनुष्ठानाने शांती, वैभव, संरक्षण, आरोग्य, ऐहिक व पारमार्थिक प्रगती ह्यांचा लाभ त्या ठिकाणाला व जे कोणी हे अनुष्ठान करतात त्यांना मिळतो. रुद्रासारखे ह्यालाही उच्च प्रतीचे अनुष्ठान असण्याची मान्यता आहे. ह्या प्रसंगी भालावली, देवीहसोळ, पेंडखले, सोलगाव, हर्चे, भडे, डोर्ले, लांजे, राजापूर, मुंबई इ. विविध ठिकाणाहून सारस्वत बांधव उपस्थित राहिले होते. उडिपीहून राजापूरकर सारस्वत समाजाच्या साधारणतः ३५ जणांच्या समूहाने ह्याप्रसंगी खास हजेरी लावली. मुंबईहून मंडळाचे कार्यवाह देविदास सिनकर व दीपक मुळ्ये, कोषाध्यक्ष उल्हास साखळकर, विश्वस्थ रमेशचंद्र तेंडुलकर व डॉ. उल्हास तेंडुलकर सहपत्नीक, अध्यक्ष श्री सिद्धार्थ सिनकर आपल्या आई-वडिलांसह हजर होते.



# Connecting Saraswats Globally

Saraswat Chamber®

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि ॥



## Be a Member. Contact Now

+91 94206 85134 | Asst Administrator - Shirish Angle
info@saraswatchamber.com

A powerful network to meet and interact with vibrant entrepreneurs at discussion forums, seminars, webinars and special member events.

### We strive to...

- improve networking among Saraswat entrepreneurs, professionals, community members who are in employment – locally and globally
- arrange various conferences and workshops on a diverse range of subjects organized in different cities and on virtual platforms
- build a community support system that supports business and help members seek better opportunities

**Global Chamber of Saraswat Entrepreneurs**
Registered Office:
2202, Manisha Garden, Navghar Road, Near Mulund Gymkhana,
Mulund East, Mumbai 400 081 | +91 94206 85134
CIN: U85310MH2019NPL330463

www.saraswatchamber.com

# सारस्वत हितवर्धक मंडळ आयोजित मोफत चष्मे वाटप व वैद्यकीय शिबिर संपन्न

'सारस्वत हितवर्धक मंडळ' ही सामाजिक बांधिलकीची ९९ वर्षे पूर्ण करून शंभराव्या वर्षात पदार्पण केलेली संस्था. या संस्थेने रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आपल्या सामाजिक कार्याने नावलौकिक मिळविला आहे. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ गरजूंसाठी मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप आणि आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करत आहे.

या वर्षी रविवार, दि. ४ फेब्रुवारी २०२४ रोजी धारतळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात, सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत हे शिबिर संपन्न झाले. या शिबिराचा सुमारे चारशे गरजूंनी लाभ घेतला. या शिबिरात रत्नागिरी येथील सुप्रसिद्ध डॉ. संजय लोटलीकर आणि त्यांच्या श्री रामनाथ हॉस्पिटलची वैद्यकीय टीम, डेरवण येथील बी. के. वालावलकर हॉस्पिटलची टीम, डोंबिवली येथील डॉ. सौ. प्रज्ञा कुलकर्णी आणि ओणी येथील डॉ. मयुरेश साखळकर यांनी उपस्थित राहून रुग्णांची तपासणी केली. रुग्णांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी मौलिक मार्गदर्शन केले. तसेच मुंबईतील प्रसिद्ध नेत्रतपासणी तज्ज्ञ अमित साखरकर व त्यांच्या टीमने नेत्रतपासणी केली. शिवाय गरजूंना मोफत चष्मे वाटपदेखील केले. ज्यांना मोतिबिंदूचे ऑपरेशन करण्याची आवश्यकता होती, अशांची जबाबदारी डेरवणच्या वालावलकर हॉस्पिटलने स्वीकारली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी धारतळे प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. निखिल परांजपे व त्यांच्या स्टाफचे मोलाचे सहकार्य लाभले. सारस्वत बँक हे या शिबिराचे पुरस्कर्ते होते.

'श्री संत गुळवणी महाराज सिद्धयोग संशोधन प्रतिष्ठान, पुणे' यांच्या सहकार्याने हे शिबिर भरवण्यात आले होते. या फाउंडेशनने आणि मंडळाचे विश्वस्त रमेशचंद्र तेंडुलकर यांनी चष्मे आणि औषधे घेण्याकरता मदत केली. या सर्वांचे मंडळ मनापासून आभारी आहे.

'सारस्वत हितवर्धक मंडळा'चे उपाध्यक्ष सुहास पोतकर, कार्यवाह देवीदास सिनकर व दीपक मुळ्ये, खजिनदार उल्हास साखळकर, व्यवस्थापक मंडळ सभासद प्रमोद तेंडुलकर, प्रताप तेंडुलकर, सुचित कावतकर, तसेच डोंबिवली येथील सभासद सुरेश लोटलीकर यांनी आयोजनात कुठेही कमतरता राहणार नाही, याची काळजी घेतली. मंडळाच्या कार्यात नेहमीच हिरिरीने सहभाग घेणारे डोंबिवलीचे सेवाभावी सभासद अशोक सिनकर यांनी या शिबिरात समन्वयकाची भूमिका उत्तम प्रकारे पार पाडली.


मंडळाचे विश्वस्त डॉ. उल्हास तेंडुलकर हे खास शिबिराकरिता उपस्थित होते. विवेकानंद केळकर यांनी नाश्ता आणि जेवणाची उत्तम सोय बघितली. तसेच तन्मय सिनकर आणि भालावली येथील ज्ञानविकास सहकारी हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी शिबिराची व्यवस्था पाहण्यास मदत केली.

शिबिराचे उद्घाटन सिनेकलाकार अशोक कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या शिबिरात प्रथमच सहभागी झालेले अशोक कुलकर्णी व डॉ. प्रज्ञा कुलकर्णी यांचा उपाध्यक्ष सुहास पोतकर यांनी शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान केला. तसेच धारतळे प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. निखिल परांजपे यांचा सत्कार सिनेकलाकार अशोक कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

शिबिराच्या शेवटी मंडळाचे कार्यवाह देवीदास सिनकर यांनी शिबिर यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.






BizCare
ARE YOU LOOKING FOR MIDC PLOTS / INDUSTRIAL GALAS IN MAHARASHTRA ?
OUR SERVICES
MIDC Plot Allotment
Resale of Plots / Galas
MIDC Plot Transfer Approvals
Consent to Mortgage ( Loan related approvals )
All permissions under MIDC, MPCB
Government Subsidies & Incentives
www.bizcareadvisors.com
Contact Dhananjay Deshmukh
deshmukh@bizcareadvisors.com
+91 9307975854
Prosperise
BUSINESS CONSULTANCY LLP
START YOUR BUSINESS IN DUBAI (UAE)
Options for incorporating companies
Dubai Mainland Company
Free Zone Company
Offshore Company
www.prosperise.in
Contact Rohan Tendulkar
rohan@prosperise.in
+91 7738990548
1, Matruchaya, GV Scheme Road No 1, Mulund East, Mumbai- 400081

# सारस्वत चेंबरचे गोवा येथे 'कन्स्ट्रक्शन आणि रिअल इस्टेट समिट' चे आयोजन




'सारस्वत चेंबर'ने ९ डिसेंबर २०२३ रोजी 'नानू रिसॉर्ट', मडगाव, गोवा येथे 'कन्स्ट्रक्शन आणि रिअल इस्टेट समिट'चे आयोजन केले होते. सकाळी ९.३० ते १ वाजेपर्यंत कन्स्ट्रक्शन आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील काम करणाऱ्या होतकरू, नवीन उद्योजकांचे एक 'नेटवर्किंग सेशन' झाले. यात जवळपास ६० हून अधिक मंडळींनी सहभाग नोंदवला.

यावेळी बांधकाम क्षेत्रातील दिग्गजांनी या नवीन उद्योजकांना मार्गदर्शन केले. एक वेगळी थिम यात निवडून लीड किती मिळू शकतील, याद्दष्टीने यात प्रयत्न केले गेले. सांगायला आनंद वाटतो की, या जवळजवळ तीन तासांच्या कार्यक्रमातून ४७० पेक्षा जास्त 'लीड्स' सर्व मान्यवरांना उपलब्ध झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास माल्या यांनी नावीन्यपूर्ण पद्धतीने केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पहिले सत्र 'कन्सल्टन्सी व्यवसाय' याविषयी होते. अतुल भोबे, मॅनेजिंग डिरेक्टर, टीपीएफ इंजिनीअरिंग प्रा. लि., यांनी बीजभाषण करताना 'व्यवसाय करताना अलिप्तता राखून व्यवसाय करावा' या मुद्द्यावर भाष्य केले.

व्यवसायात आलेल्या कडू-गोड अनुभवांचे कथन उपस्थितांना मार्गदर्शक ठरले. त्यानंतर झालेल्या चर्चासत्रात अतुल भोबे, माधव कामत, महेंद्र काकुले, अमित सुखठणकर या धुरिणांनी वेगवेगळ्या पैलूंवर भाष्य केले. तंत्रज्ञानाचा वापर करून आपण कसे पुढे जात राहू या, याचा सर्वंकष विचार झाला. राजेश केंकरे यांनी सूत्रसंचालन केले.

'कॉन्ट्रॅक्टिंग/वेंडर बिजनेस' हा दुसऱ्या सत्राचा विषय होता आणि मुख्य वक्ते होते चेतन रायकर. 'कोणताही व्यवसाय जीव ओतून केला पाहिजे, अलिप्ततेला यात थारा नाही' अशा विधानाने सुरुवात करत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सत्रात राघवेंद्र पै, पल्लवी डांगी, समीर सुरलाकर यांनी आपापल्या व्यवसायातील अनुभव कथन केले. या सत्राची सूत्रे भारत कामत यांच्याकडे होती.

शेवटचं सत्र 'बिल्डर/डेव्हलपर बिजनेस' या विषयावर







होते. भूषण नेमळेकर हे या सत्राचे प्रमुख वक्ते होते. 'चीन आणि भारत' यातील फरक स्पष्ट करताना, 'भारताच्या रिअल इस्टेट मार्केट'च्या वाढीची ही सुरुवात आहे, अजून खूपच मोठा पल्ला आपल्याला गाठायचा आहे. २०२३ भारतासाठी बांधकाम व्यवसायासाठी चांगले गेले. चीनसाठी हे वर्ष वाईट गेले, तरीसुद्धा त्यांची विक्री भारतापेक्षा १६ पटीने अधिक होती. यावरून आपल्याला कुठे पोहोचायचे आहे, याचा अंदाज येईल', असे प्रतिपादन त्यांनी केले. भूषण नेमळेकर, परेश पै, निरेश नाईक आणि तन्मय खोलकर यांनी बांधकाम व्यवसायाविषयीचे आपले विचार मांडले. सचिन पै रायकर यांनी प्रमुख पाहुण्यांना बोलते केले.

यानंतर 'कन्स्ट्रक्शन आणि रिअल इस्टेट' क्षेत्रातील धुरिणांचा 'जीवन गौरव' अवॉर्ड देऊन सत्कार केला. यात अरविंद खांदेपारकर, नीना पाणंदीकर, माधव कामत, महेश आडवलपलकर, उदय नाचिनोलकर, गुरुदत्त संझगिरी, मंगेश सुकथनकर आणि नारायण नाईक यांचा समावेश होता.

दुपारपासून सुरू झालेल्या कार्यक्रमाचेदेखील प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सुहास माल्या यांनी मोठ्या खुमासदार पद्धतीने केले.

तो एक वेगळाच दिवस होता गोव्यातला, समुद्राच्या साक्षीने नानू रिसॉर्टमध्ये झालेल्या चर्चा, थोरा मोठ्यांचे अनुभव आणि जुन्या आठवणींचा दरवळ आसमंतात भरून राहिलेला. असे म्हणतात की, 'अ हाऊस इज बिल्ट बाय हँड्स, बट अ होम इज बिल्ट बाय हार्ट'.

सारस्वत चेंबर विस्तारत आहे, जगभरातून माणसे जोडली जात आहेत. एक कुटुंब म्हणून सर्वजण काम करत आहेत. 'कन्स्ट्रक्शन आणि रिअल इस्टेट समिट'च्या माध्यमातून हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# सारस्वत बोर्डिंगकडून विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग

**डॉ. रजनीश कामत : विद्यार्थी वसतिगृहात नवीन विस्तारित बांधकामाचे उद्‌घाटन**



**सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृहाच्या तिसरा व चौथा मजला विस्तारीत बांधकामाचे उद्‌घाटन डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हरसिटीचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.**

**कोल्हापूर :** श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृहाला मोठी परंपरा लाभली आहे. संस्थेने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी निवासाची व्यवस्था करण्याबरोबरच त्यांच्या जीवनाला आकारही दिला. वसतिगृहाने शिस्त, गुणवत्ता आणि संस्कार या गोष्टी विद्यार्थ्यांच्या अंगी रुजवून त्यांना यशाचा मार्ग दाखविला, असे गौरवोद्गार डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी येथे बोलताना काढले.

कोल्हापूर येथील श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृहाच्या तिसरा व चौथा मजला नवीन विस्तारित बांधकामाचे उदघाटन व शिष्यवृत्ती वितरण असा संयुक्त समारंभ पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कामत बोलत होते. संस्थेच्या सारस्वत भवन येथे हा कार्यक्रम झाला. आपल्या जडणघडणीमध्ये कोल्हापूरचा वाटा असल्याचे सांगत कुलगुरू कामत म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी स्वतःमधील शक्ती ओळखावी. कौशल्य विकसित करावेत. आपल्यातील नकारात्मक बाबी बाजूला ठेवून सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वाटचाल केल्यास जीवनात नक्कीच यश लाभते. जीवनात हुशारीसोबतच मूल्ये ही अधिक महत्त्वाची आहेत. संस्थेचे अध्यक्ष मोहन देशपांडे यांनी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. उपाध्यक्ष सिद्धार्थ लाटकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या प्रसंगी संस्थेतर्फे डॉ. दुर्गाप्रसाद कामत, ज्येष्ठ सभासद बाजीराव कामत, मोहन दळवी, मंगेश दळवी, प्रकाश प्रभू-इंगळीकर, प्रा. डॉ. अनिल वायगणकर, उल्हास शानभाग, किशोर सातोसकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तिसऱ्या व चौथ्या मजल्याच्या बांधकामासाठी योगदान दिलेल्या आर्किटेक्ट वंदना खुशाळकर, संस्थेचे सहसचिव अमित सलगर, सचिन जनवाडकर, नितीन साळोखे, संजय निले, दीपक काळे, जावेद पटेल, अब्दुल कुरणे, मंदार कांदळकर, समीर वायकूळ, संग्राम पाटील, होस्टेलचे अधीक्षक संजय भोपळे, विद्यार्थी प्रतिनिधी स्वरूप माने आदींचा सत्कार करण्यात आला. सचिव सुधीर कुलकर्णी यांनी शिष्यवृत्ती योजनेबद्दल माहिती सांगितली. विद्यार्थी विश्वजीत पाटील, स्वप्निल काशीद यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे विश्वस्त धनंजय देशपांडे यांनी आभार मानले.

***

बीजगणितामध्ये उदाहरण सोडविताना एक अज्ञात 'क्ष' घ्यावा लागतो. उत्तर येईपर्यंत त्या 'क्ष'ची खरी किंमत काय, हे आपल्याला कळत नाही. पण तो घेतल्याशिवाय चालत नाही. त्याप्रमाणे जीवनाचे कोडे सोडविण्यासाठी आज अज्ञात असा भगवंत आपल्याला गृहीत धरलाच पाहिजे. त्या भगवंताचे खरे स्वरूप, जीवनाचे कोडे सुटेल, त्यावेळी आपल्याला कळेल.

**- श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

सार्व.न्यास.नों.क्र.: के.ए.११६/को. 'ज्ञानसेवा' स्थापना : २०/०५/१९१५

# श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह

२९६४, सी वॉर्ड, दसरा चौक, फोन नं. ०२३१-२६४४१११, कोल्हापूर ४१६ ००२.

Email : saraswatboardingkolhapur@gmail.com Website : www.saraswatboarding.org

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी, ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची संधी मिळावी म्हणून १०८ वर्षापुवी दिलेली जागा व आर्थिक पाळबळ आणि दातृत्वाचा व मातृत्वाचा मानदंड असलेल्या मातोश्री कै.श्रीमती सरस्वतीबाई लाटकर यांच्या उदार देणगीतून बांधलेल्या वसतिगृहाचे उद्‌घाटन राजर्षींच्या हस्ते दिनांक २० मे, १९१५ रोजी झाले आणि अनेक स्थित्यंतरे पहात हां हां म्हणता वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांना पूर्वसुरींनी दिलेल्या संधीचे अक्षरश: सोनं केलं काहींनी तर आपल्या कुटुंबाचे, बोर्डींगचे तसेच देशाचे नाव जागतिक पातळीवर उंचावले.

## संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

- सर्व आधुनिक सोयीनियुक्त अशा वसतिगृहात गुणवत्तेनुसार १५६ विद्यार्थ्यांसाठी माफक फीमध्ये प्रवेश.
- सारस्वत विद्यार्थ्यांना तसेच इतर समाजातील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना फीमध्ये ५० टक्के सवलत.
- पिण्यासाठी शुद्ध पाणी व अंघोळीसाठी गरम पाणी.
- अभ्यासिका, ग्रंथालय, ई लायब्ररी, प्रशस्त सभागृह इ. सुविधा
- निवासी विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनपर मार्गदर्शक व्याख्याने, आरोग्य तपासणी, स्नेहसंमेलन, क्रिडा महोत्सव, राष्ट्रीय सण व गणेशोत्सव सारखे कार्यक्रम.
- वसतिगृह प्रांगणात ओपन जीम (खुली व्यायामशाळा) सुविधा.
- वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर निवासी शिष्यवृत्ती.

## शैक्षणिक शिष्यवृत्ती :

१. कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या चार जिल्ह्यातील सारस्वत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पारितोषिके आणि संशोधनासाठी अर्थसहाय्य

२. उच्च शिक्षणासाठी परतफेडीची शिष्यवृत्ती.

३. सारस्वत मान्यवरांनी संस्थेकडे दिलेल्या पुरस्कृत ठेवींवरील व्याजातून सारस्वत गुणवंत, तसेच गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना पारितोषिके.

QR CODE

श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह

### संस्थेचे बँक खाते

श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह

स्टेट बँक ऑफ इंडिया,

शाखा : दसरा चौक, कोल्हापूर

बँक खाते क्रमांक : १०९६७००३५९८

IFSC Code : SBIN0000413

## विश्वस्त मंडळ

**पदाधिकारी**

**अध्यक्ष** – श्री.मोहन नारायण देशपांडे

**उपाध्यक्ष** – श्री.सिध्दार्थ मनमोहन लाटकर

**मा.सचिव** – श्री.सुधीर चिंतामण कुलकर्णी

**सहसचिव** – श्री.अमित अरुण सलगर

**विश्वस्त**

श्री.संजय उर्फ बाबा पांडूरंग वाघापूरकर

डॉ.गजानन गोपाळ आसगेकर

ॲड.धनंजय रघुनाथ देशपांडे

श्री.संजीव राजाराम बोरकर

श्री.सचिन रामकृष्ण शानभाग

टीप – ज्या समाजबांधवाना वसतिगृहासाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी मा.सचिव यांचेशी संपर्क साधावा व देणगी रक्कम दिलेल्या QR कोड द्वारे संस्थेच्या खातेवर जमा करुन सहकार्य करावे.
(संपर्क :- श्री.सुधीर चिंतामण कुलकर्णी, मा.सचिव, फोन ०२३१-२६४४१११, मो.नं. ९९२१४३४९६४)

---

सार्व.न्यास.नों.क्र.एफ-५२४ स्थापना : १२/०६/१९७५

# सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर

२९६४, सी वॉर्ड, दसरा चौक, कोल्हापूर ४१६ ००२. फोन नं. ०२३१-२६४४१११,

Email : saraswatvikasmandalkolhapur@gmail.com

वसतिगृहाच्या स्थापनेनंतर पुढील काळामध्ये अनेक सामाजिक स्थित्यंतरे झाली. ज्याचा प्रभाव समाजावर पडून जीवनशैली, कुटुंबव्यवस्था, सामाजिक गरजांमध्ये बदल दिसू लागले. वसतिगृहासाठी काम करत असताना समाजधुरीणांना शिक्षणाव्यतिरिक्त इतरही सामाजिक गरजा व अडचणी लक्षात आल्या. सदर अडचणींचे निराकरण करणेसाठी व्यापक हेतूने कार्यरत संस्थेची गरज भासू लागली, म्हणून सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर या संस्थेची स्थापना करणेत आली. ही संस्था विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे पार पाडत आहे.

## सामाजिक कार्यक्रम

- दरवर्षी २६ जानेवारी रोजी तिळगूळ, हळदीकुंकू व वाण वाटप समारंभ, बालकांचे बोरन्हाण, वेशभूषा स्पर्धा, ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार इ.

## सांस्कृतिक कार्यक्रम :

- सामुदायिक गणेशोत्सव या कार्यक्रमातून समाज बांधवांना एकत्र आणणे व आपसातील वैचारिक, सामाजिक देवाण-घेवाण वाढवणे, यावर भर दिला जातो. संस्थेवरील समाजबांधवांचा जिव्हाळा वाढावा याकडे खास लक्ष दिले जाते. सदर कार्यक्रम उत्साहात साजरा केला जातो.
- हीच वेळ साधून मुलांसाठी निरनिराळ्या स्पर्धा व विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजला जातो.
- गणेश विसर्जनाचे दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

## कौटुंबिक कार्यक्रम

वधूवर व पालक परिचय मेळावा समाजातर्फे वधूवर सूचक केंद्र चालवले जाते. दर महिन्यांच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये वसतिगृहातील अभ्यासिकेत वधूवर नोंदणी व वधूवर विषयक माहितीची देवाण-घेवाण केली जाते. प्रतिवर्षी पाच वधूवर पालक परिचय मेळावे घेतले जातात. या मेळाव्यांची तसेच इतर माहिती ९११२० ४१९७५ या व्हॉटस्‌अप क्रमांकाद्वारे देणेत येते. मेळाव्यातील उपस्थितांसाठी अल्पोपहार व चहापानाची विनामूल्य व्यवस्था केली जाते. नोंदणीसाठी वार्षिक शुल्क रु.३००/- घेतले जाते. मेळाव्यात सहभागी होणेसाठी वेगळे शुल्क आकारले जात नाही. मेळाव्यास मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. सदर मेळाव्याच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक विवाह संपन्न झाले आहेत.

## सारस्वत विकास मंडळ (विश्वस्त मंडळ)

श्री. सचिन उर्फ कल्याण मंगेश जनवाडकर – अध्यक्ष

श्री. संजीव. रा. बोरकर – उपाध्यक्ष

श्री. मुकुंद. म. कुलकर्णी (गुंजीकर) – सचिव

ॲड. शरद खासनीस – सहसचिव

श्री. गुरुनाथ. वि. देशपांडे – खजिनदार

श्री. गिरीश घोलकर – विश्वस्त

श्री. सुधीर. चिं.कुलकर्णी – विश्वस्त

श्री. दिपक देशपांडे – विश्वस्त

श्री. सुनील होळणकर – विश्वस्त,

श्री. विठ्ठल कुलकर्णी – निमंत्रित

सौ. माधवी देशपांडे – निमंत्रित

QR CODE

### संस्थेचे बँक खाते

सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर

कॅनरा बँक लक्ष्मीपुरी शाखा, कोल्हापूर

बँक खाते क्रमांक : ०३०४१०१००५२७९

IFSC Code CNRB0000304

टीप – ज्या समाजबांधवाना संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमासाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी मा. सचिव यांचेशी संपर्क साधावा व देणगी रक्कम सोबत दिलेल्या QR कोड द्वारे संस्थेच्या खातेवर जमा करुन सहकार्य करावे. (संपर्क :- श्री. मुकुंद कुलकर्णी (गुंजीकर) सचिव मो.नं. ९४०४७००८२०)

# सारस्वत महिला मंडळ आयोजित कुंकू मार्चन सोहळा




'सारस्वत विकास मंडळ', तसेच 'सारस्वत महिला मंडळ' आयोजित 'नारायणी कुंकू मार्चन ग्रुप' यांचे मार्फत दि. १४ फेब्रुवारी रोजी घेतलेला सुंदर असा कुंकू मार्चन हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध रीतीने पार पडला.

या सोहळ्याकरता सौ. सुमंगला पै, सौ. माधवी देशपांडे, सौ. स्नेहल कामत यांनी नाव नोंदणीची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या महिला मंडळ सदस्यांचे व कार्यकर्त्यांचे या योगदानाबद्दल सर्वांचे आणि या कार्यक्रमासाठी सारस्वत बोर्डिंगने आपल्याला हॉल उपलब्ध करून दिला, त्यांचे व कर्मचाऱ्यांचे आणि उपस्थित सर्वांचे सारस्वत विकास मंडळातर्फे आभार मानले.

या कार्यक्रमाचे गुरुजी श्री. बाखरे गुरुजी यांनी छानरीत्या कुंकू मार्चन विधिवत केले. यासाठी समस्त सारस्वत महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला होता.

हर्षांक हरळीकर यांनी या कार्यक्रमाकरिता उपस्थित सर्वांना चहा कॉफी व अल्पोपहार प्रायोजित केला होता. तसेच श्री. दीपक देशपांडे यांनी सपत्नीक सर्वांना वाण वाटप केले. यापुढील कार्यक्रम श्रीसूक्त व अग्निहोत्र करीत आहोत. याची तारीख लवकरच जाहीर केली जाईल.

९ जून २०२४ ला सारस्वत खाद्यमहोत्सव, तसेच काही स्टॉल व कलाकुसर प्रदर्शन हे होणार आहे. त्याची माहिती महिला मंडळाडून सविस्तरपणे नंतर दिली जाईल.

सुवर्ण महोत्सवानिमित्त या व अशा पुढील अनेक कार्यक्रमांची आणि इतर माहिती आपल्याला दर दोन महिन्यांनी निघणाऱ्या सारस्वतेय प्राजक्त अंक व व्हॉट्अप ग्रुपद्वारे मिळेल.

या कार्यक्रमास जशी आपली प्रचंड उपस्थिती, प्रतिसाद आणि सहकार्य लाभले, तसेच सर्व कार्यक्रमांस कायम लाभो, हीच विनंती.

***

## आयुष्य जगताना...

आयुष्याची स्वप्ने पाहताना
वास्तवाला विसरायचं नसतं.
गुलाबाला स्पर्श करताना
काट्याचं भान ठेवायचं असतं.
प्रीतीच्या मोहात वावरताना
जपून पाऊल टाकायचं असतं.
काळजाला झटका बसल्यावर
कधीच रडायचं नसतं
उध्वस्त झालेलं विश्व आपण
शून्यातून उभं करायचं असतं.

With Best Compliments from

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना

या ब्रह्माच्युत शंकरप्रभुतिभि दैवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेषजाड्यापहा

# ALL INDIA SARASWAT CULTURAL ORGANISATION

## Joining Hands in Harmony

The organisation aims at progressive goals and objectives
to promote Cultural, Educational and
Socio – Economic activities for the Saraswats

**President**
Dr. Ajit Gunjikar

**Vice Presidents**
Subhash Saraf    Girish Joshi    Girish Pikale    Ulhas Kamat

**Secretaries**
Rajendra Pai    Uday Redkar

**Treasurer**
Ramnath Juwarkar

Botawala Bldg., Sitaladevi Temple Rd., Mahim, Mumbai – 400016.
Website: www.aisco.org.in Email - office.admin@aisco.org.in

## गौरवगाथा

# अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार



ज्येष्ठ मराठी चित्रपट आणि नाट्य अभिनेते अशोक सराफ यांना कलाक्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ चा मानाचा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला आहे. अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे, तर गंभीर स्वरूपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन आपल्या अभिनयातून घडविले आणि रसिकांवर अधिराज्य गाजवले आहे.

अशोक सराफ यांचे मूळ गाव शहापूर (बेळगाव). त्यांचा जन्म मुंबईत झाला. दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचं बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा. वयाच्या सातव्या वर्षी एका बालनाट्य स्पर्धेत यशस्वी अभिनेत्याचं रौप्यपदक त्यांना मिळालं. त्यांच्या आयुष्यातील हे पहिलं पदक. त्यानंतर मात्र पदकांची रांगच लागली. कॉलेज सोडल्यानंतर त्यांना स्टेट बँकेत नोकरी मिळाली. मात्र त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वि. वा. शिरवाडकरांच्या 'ययाती आणि देवयानी' या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेने त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं. काही संगीत नाटकांमधूनदेखील त्यांनी भूमिका केल्या होत्या. 'दोन्ही घरचा पाहुणा' हा त्यांचा पहिला चित्रपट.

'पांडू हवालदार'मधील कोंडू हवालदाराच्या विनोदी भूमिकेने त्यांना अवघ्या महाराष्ट्रात लोकप्रियता मिळवून दिली. 'अशी ही बनवाबनवी', 'कळत नकळत', 'गोंधळात गोंधळ', 'तुमचं आमचं जमलं', 'धूमधडाका', 'दे दणादण' हे त्यांचे विनोदी भूमिकेचे काही प्रमुख चित्रपट. 'हम पांच' या मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाची झलक दाखवली होती. आतापर्यंत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. सध्या त्यांचं 'व्हॅक्यूम क्लिनर' हे नाटक गाजत आहे.

हिंदी आणि मराठीतील विविध भूमिकांसाठी त्यांना राज्य पुरस्कार, फिल्म फेअर पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. १० मे २०१४ रोजी सारस्वत बँक भवन प्रभादेवी येथे पार पडलेल्या सारस्वत चैतन्य गौरव सोहळ्यात 'सारस्वत प्रकाशन विश्वस्त संस्था' पुरस्कृत पुरस्कारही त्यांना सन्मानाने प्रदान करण्यात आला होता.

# रोहन पंडित यांचा विशेष पुरस्काराने गौरव



नुकत्याच घोषित झालेल्या बी.सी.सी.आय. वार्षिक पारितोषिकांमध्ये २०२३चा 'सर्वोत्कृष्ट पंच-डोमेस्टिक क्रिकेट २०२२-२०२३' हा पुरस्कार रोहन पंडित यांस प्राप्त झाला आहे. अतिशय मानाचा आणि विशेष समजल्या जाणाऱ्या 'बोर्ड ऑफ क्रिकेट कंट्रोल इन इंडिया' या जगप्रसिद्ध संस्थेच्या पुरस्काराने नावाजले जाणारे रोहन पंडित हे क्रिकेटपंढरी मुंबईचे सारस्वत.

२३ जानेवारी २०२४ रोजी धुमधडाक्यात पार पडलेल्या सोहळ्यात हैद्राबाद येथील हॉटेल पार्क, हयात येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोहन यांची नुकतीच 'इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिल' या जागतिक संस्थेच्या आंतरराष्ट्रीय पंचांच्या श्रेणीत निवड झाली आहे. हे दुहेरी नामांकन आणि पुरस्कार प्राप्तीबद्दल रोहन पंडित यांचे विशेष अभिनंदन. सारस्वतांच्या उल्लेखनीय व जागतिक श्रेणीच्या प्रतिभाशाली यादीत रोहन पंडित यांच्या समावेशाने अभिमान व अत्यानंद होत आहे. 'सारस्वत चैतन्य'तर्फे रोहन पंडित यांचे विशेष अभिनंदन!

The Board of Trustees of the Temples, Charitable Institutions and Funds of the Goud Saraswat Brahman Community of Mumbai
Popularly Known as

(Estd : 1879) (स्थापना : १८७९)

**Goud Saraswat Brahman Temple Trust**

Shree Balaji Ramji Mandir Buillding, Second Floor,
41-47, Bhuleshwar Road, Mumbai 400 002

**गौड सारस्वत ब्राह्मण टेंपल ट्रस्ट**

श्रीबालाजी रामजी मंदिर बिल्डींग, दुसरा मजला,
४१-४७, भुलेश्वर रोड, मुंबई ४०० ००२

Tel.: 022-2240 4482* Public Trust No. A558 B* E-mail : gsbtempletrust@gmail.com*Mahim Office : Tel. : 022-24446956



# जी एस बी टेंपल ट्रस्ट, मुंबई (स्थापना - १८७९)

# (मुंबईतील सर्वात जुना देवालयांचा ट्रस्ट)

## ट्रस्टच्या अधिपत्याखालील देवालये

(१) शितळादेवी, माहीम परिसरातील शांतादुर्गेच्या देवालयासह काही देवालये.
(२) मुरलीधर मंदिर, माहीम. (३) श्रीवालुकेश्वर मंदिर, बाणगंगा.
(४) श्रीभुलेश्वर मंदिर, भुलेश्वर (५) श्रीबालाजी रामजी मंदिर, भुलेश्वर.
बाणगंगा तलावही जी एस बी टेंपल ट्रस्टच्या मालकीचा आहे.

## ट्रस्टचे उपक्रम

(१) सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यात येते.
(२) सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या गरीब रुग्णांना हॉस्पिटलाच्या खर्चाची काही प्रमाणात भरपाई देण्यात येते.
(३) धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा (राजकीय संघटना वगळून) अन्य सर्व संघटनांना आर्थिक मदत देण्यात येते.
(४) गरजू व गरीबांना आर्थिक मदत देण्यात येते.
(५) गरजू संस्थांना तांदूळ व साडी वाटप करण्यात येते.
(६) कोरोना बाधित रुग्णांना फार मोठ्या प्रमाणात ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.
(७) कोरोनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या बऱ्याच व्यक्तींना ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.
(८) नैसर्गिक आपत्तीत सापडणाऱ्या संस्था व व्यक्तींना ट्रस्ट आर्थिक मदत करते.
(९) कुटुंबियांचे देव - ज्या सारस्वत ब्राह्मण कुटुंबांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांमुळे त्यांच्या घरातील (गावातील किंवा मुंबईतील) देवांची दररोज पूजा करणे जमत नाही किंवा शक्य होत नाही असे विविध कुटुंबांचे देव हा ट्रस्ट स्वीकारतो. हे देव ठेवण्यासाठी खास सोय असून या देवांची ट्रस्टच्या पुजाऱ्यामार्फत रोज यथासांग पूजा केली जाते. यासाठी ट्रस्टच्या भुलेश्वर येथे मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.
(१०) धर्मशाळा- आपल्या ट्रस्टच्या मालकीची मरीन लाईन्स (पूर्व) चंदनवाडी येथे धर्मशाळा असून येथे ज्ञातीतील तसेच ज्ञातीबाहेरील व्यक्तींचे निधनानंतरचे नववे, दहावे, अकरावे, बारावे व तेरावे हे विधी करण्याची सोय आहे.

**प्रविण कानविंदे**
अध्यक्ष

**शशांक गुळगुळे**
मानद सचिव व कायम विश्वस्त

**अवधूत दाभोळकर**
कायम विश्वस्त

**कल्पना प्रभू**
मानद खजिनदार

# चंद्रायान व गगनयान मोहिमेत मंदार पाडगांवकरांचा प्रत्यक्ष सहभाग!

‘इस्रो’ या भारतीय अंतराळशोधक नामांकित संस्थेच्या विशेष प्रकल्पांना आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाच्या कौशल्यावर लिलया हाताळणारे आणि ‘टाटा कन्सल्टिंग इंजिनीअर्स’ या टाटा समूहाच्या अग्रगण्य अभियांत्रिकी कंपनीमध्ये जनरल मॅनेजर या पदावर कार्यरत मंदार पाडगांवकर यांना नुकताच टाटा उद्योग समूहाकडून विशेष मानाचा आणि कुशाग्र बुद्धिमत्तेचा समजला जाणारा ‘टाटा इनोव्हिस्टा २०२३’ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंदार हे या पुरस्काराचे २०२२ व २०२३ या दोन्ही वर्षांचे सलग मानकरी ठरले आहेत.

मंदार यांनी इस्रोचे पाच अत्यंत महत्त्वाचे विविध प्रकल्प हाताळले आहेत. नावीन्यपूर्ण शोध, चौकटीबाहेरील विचारसरणी व आव्हानांचे संधीत रूपांतर करण्याचे कौशल्य, या मंदारच्या स्वभाव व कार्यवृत्तीची इस्रो या संस्थेच्या कार्यपद्धतीशी मेळ बसविण्यात उत्तम मदत झाली. भारताच्या अंतराळ मोहिमेसंबंधी कार्यात ‘चंद्रायान’ व ‘गगनयान’ या अतिमहत्त्वाच्या योजनेत मंदार यांचे भरीव योगदान, ही त्यांच्या अविस्मरणीय कर्तृत्वाची अनोखी व हृदयात विशेष कोरलेली ठेव!

विविध सहकाऱ्यांबरोबर काम करताना प्रकल्पाचा प्रमुख अधिकारी या नात्याने आव्हानांचा सामना व त्यातून निष्पन्न केलेली संधी ही सांघिक असते, असे मंदार यांचे मत आहे.




‘मास्टर्स ऑफ मेकॅनिकल इंजिनीअरिंग’ ही उच्चपदवी मंदार यांनी प्रथम क्रमांकाने पटकावली आहे.

गेली २५ वर्षे मेकॅनिकल इंजिनीअरिंग या क्षेत्रात मशीन डिझाइन या विषयात पारंगत व निपुणता प्राप्त केलेले मंदार, आपल्या यशाचं श्रेय आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींचा आशीर्वाद व सदैव दिलेल्या प्रोत्साहनाला देतात. ‘सारस्वत चैतन्य’तर्फे मंदार पाडगांवकर यांचे विशेष अभिनंदन.

---

# अमेय प्रभू आयसीसीच्या अध्यक्षपदी

**१९२५ नंतर पहिल्यांदाच मराठी माणसाकडे अध्यक्षपद**




‘एनएएफए कॅपिटल ॲडव्हायजर्स’चे संस्थापक तथा व्यवस्थापकीय संचालक अमेय सुरेश प्रभू यांनी ‘इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या (आयसीसी) अध्यक्षपदाचा कार्यभार नुकताच स्वीकारला. माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांचे ते पुत्र आहेत.

कोलकाता येथील ‘ताज बेंगॉल हॉटेल’मध्ये झालेल्या आयसीसीच्या वार्षिक सभेत त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. यूएपी ॲडव्हायजर्स एलएलपीचे भागीदार असलेले प्रभू हे प. बंगाल बाहेरील पहिले आयसीसी अध्यक्ष ठरले आहेत. कोलकत्यात मुख्यालय असलेली आयसीसी ही भारतातील सर्वाधिक जुनी चेंबर ऑफ कॉमर्स’ संस्था असून 1925 पासून ती देशाच्या व्यावसायिक क्षेत्रात सक्रीय आहे.

व्यावसायिक, लेखक व समाजसेवक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या अमेय प्रभू यांनी ब्रिटनमधील वर्विक विद्यापीठातून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास या विषयात बीएस्सी पदवी प्राप्त केली आहे. तसेच माद्रिद येथील आयई बिझनेस स्कूलमधून त्यांनी वित्तीय व्यवस्थापनात एमएस्सी केले आहे.

कार्यक्रम प्रसंगी प्रभू यांनी सांगितले की, हा नवा अध्याय माझ्यासाठी नवीन आव्हाने आणि जबाबदाऱ्या घेऊन आला असून मी खुल्या बाहूंनी त्याचा स्वीकार करतो. येणाऱ्या वर्षांत आयसीसी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर नवी भरारी घेऊन खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाची संस्था होईल, याची मला खात्री आहे.

## पत्रकार प्रशांत सिनकर यांना ‘उत्तम भारत’ आणि ‘अचिव्हर आयकॉन अवॉर्ड’ पुरस्कार




पर्यावरण संवर्धनविषयक जनजागृती करणारे अभ्यासू पत्रकार प्रशांत रवींद्र सिनकर यांना जम्मू-काश्मीर येथील ‘जीएचआरटी संस्थे’चा ‘उत्तम भारत’ आणि जबलपूरमधील ‘एसएनए संस्थे’चा ‘अॅचिवर आयकॉन अवॉर्ड २०२४’ अशा दोन प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

पत्रकारिता करत असताना पर्यावरण संवर्धनासाठी बहुमूल्य योगदान दिल्याबद्दल पत्रकार प्रशांत सिनकर यांना राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा ‘ग्लोबल ह्युमन राईट ट्रस्ट’ यांच्या माध्यमातून दिला जाणारा ‘उत्तम भारत’ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. एच. आर. रेहमान यांनी दिली. तर मध्यप्रदेश-जबलपूरमधील ‘समय न्यूज एजन्सी’च्या वतीने ‘अॅचिवर आयकॉन अवॉर्ड २०२४’ हा पुरस्कार देऊन प्रशांत सिनकर यांना सन्मानित केले आहे.

मुंबई-ठाणे-पालघर जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धनविषयक बातम्यांतून जनजागृती करण्यास प्रशांत सिनकर यांनी नेहमी प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा गौरव राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आला आहे. याआधी सिनकर यांना महाराष्ट्र शासनाचा ‘शि. म. परांजपे पुरस्कार’, नेपाळ येथील आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेत ‘इको-२०१३ पुरस्कार’, ‘भारतरत्न राजीव गांधी पर्यावरण भूषण पुरस्कार’, ठाणे महापालिकेचा ‘ठाणे गुणीजन ठाणे गौरव’, पश्चिम बंगाल येथील भारत सरकारशी संलग्न काम करणाऱ्या नव्या फाउंडेशनचा ‘राष्ट्रीय साहित्य शिरोमणी सन्मान २०२३’ इत्यादी पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

## डॉ. प्रथमेश नाडकर्णी यांना वयाच्या बत्तीसाव्या वर्षी पी.एच.डी



कलमठच्या प्रथमेश सुनील नाडकर्णी यांनी वयाच्या बत्तीसाव्या वर्षी पी.एच.डी. पदवी मिळवली आहे.

ग्रामीण भागातून आलेल्या प्रथमेश नाडकर्णी यांनी कुशाग्र बुद्धी आणि मेहनतीच्या जोरावर डॉक्टरेट मिळवून अनेक तरुणांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

डॉ. प्रथमेश यांचे प्राथमिक शिक्षण वरवडे सेंट उर्सुला विद्यालय येथे झाले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्यात आले. आबासो गरवारे महाविद्यालयातील विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर ए आय ई.ई.ई. ही इंजिनीअरिंगसाठीची परीक्षा ६३ गुण मिळवून पास झाले. त्यानंतर त्यांनी मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग या पुण्यातील नामवंत कॉलेजमधून इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. पुढे पुण्यातीलच एम.आय.टी कॉलेजमधून ‘मार्केटिंग मॅनेजमेंट’ या विषयात एम.बी.ए. पूर्ण केले. त्यात ते युनिव्हर्सिटी टॉपर होते.

एम.बी.ए.नंतर वेलिंगकर इन्स्टिट्यूटमधून पी.जी. डी. एम. हा दोन वर्षाचा कोर्स केला. त्यानंतर ‘शिक्षण अंतरविद्याशाखीय व्यवस्थापन’ हा विषय निवडून त्यामध्ये त्यांनी पी.एच.डी. संपादन केली. यानंतर पोस्ट डॉक्टरेट करण्याचा त्यांचा मानस असून यासाठी त्यांनी ‘ड्रामा टेक्निक मेथड’ हा विषय निवडला आहे.

डॉ. प्रथमेश हे सध्या जे.एस.पी.एम. युनिव्हर्सिटी पुणे येथे असिस्टंट प्रोफेसर म्हणून काम करत आहेत. आपल्या या यशाचे श्रेय ते वडील सुनील नाडकर्णी, आई सीमा नाडकर्णी, पत्नी केतकी, गुरुवर्य डॉ. रवी जोशी, कणकवली येथील मॉडर्न क्लासचे संदीप राऊळ सर यांना देतात.

# विकास साखळकर यांना राज्यस्तरीय समाजरत्न,
# तर स्वरा साखळकर हिला यूथ आयडॉल पुरस्कार प्रदान




रक्तदान हेच श्रेष्ठदान मानून गेल्या १८ वर्षांत तब्बल ४६ वेळा रक्तदान करणाऱ्या विकास साखळकर यांना राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्काराने, तर त्यांची मुलगी स्वरा साखळकर हिला तिच्या ताक्वाँदोमधील कामागिरीसाठी 'यूथ आयडॉल' पुरस्काराने गौरवण्यात आले.

एक सर्वसामान्य चालक म्हणून काम करणारे विकास साखळकर रक्तदान करणे हा छंद मानून गेली १८ वर्षे रक्तदान करत आहेत. यांच्या या कामाची दखल घेत त्यांना समाजरत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून साखळकर यांचा हा तिसरा राज्यस्तरीय पुरस्कार आहे. यापूर्वी त्यांना २०२२ मध्ये 'क्रांतिसूर्य सामाजिक संघटना बारामती' या संस्थेकडून 'समाजभूषण' पुरस्काराने, तर २०२३ मध्ये 'तथागत ग्रुप बुलडाणा' या सामाजिक संस्थेकडून 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण' पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे.


विकास साखळकर हे दर तीन महिन्याने जिल्हा शासकीय रुग्णालयात जाऊन रक्तदान करतात. तसेच रुग्णालयामध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णास रक्ताची तातडीची आवश्यकता असताना रक्त उपलब्ध करून देण्याचे काम करतात.

विकास साखळकर यांची मुलगी, स्वरा साखळकर हिलादेखील तिने तायक्वांदोमध्ये केलेल्या उत्तुंग अशा कामगिरीसाठी 'यूथ आयडॉल पुरस्कारा'ने गौरविण्यात आले आहे.

तायक्वांदोमध्ये जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर आपल्या विशेष कामगिरीने ठसा उमटवणाऱ्या स्वराचा विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला. स्वराने आजपर्यंत तायक्वाँदोमध्ये २६ सुवर्णपदके, ७ रौप्यपदके, तर ९ कांस्यपदके मिळवून अल्पावधीतच 'सुवर्णकन्या' होण्याचा मान मिळवला आहे.

नोएडा येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतही तिने उल्लेखनीय कामगिरी केली असून सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्रातील ज्येष्ठ कवी, व्याख्याते अनंत राऊत, क्रांतिसूर्य सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब सावंत, चॉंद भैया शेख यांच्या हस्ते विकास साखळकर आणि स्वरा साखळकर या पिता-पुत्रीचा गौरव करण्यात आला.


स्वराने इतक्या लहान वयात राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल तिचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे.



SHREE

# MANGIRISH PRATISHTHAN DHARMIK NYAS





श्री स्वामी समर्थांच्या कृपेनें आणि
सदगुरू चिटणीस बाबांच्या मार्गदर्शनानुसार
**'श्री मांगिरीश प्रतिष्ठान धार्मिक न्यास'** या संस्थेतर्फे धार्मिक आणि
समाजकार्य करण्याच्या उद्देशाने एक वास्तू नेरळ गावी (साधकाश्रमाजवळ,
कर्जतपासून दोन स्टेशन अगोदर ) उभारण्याचा संकल्प केलेला आहे.

### संकल्प

१. श्री मंगेश, महालक्ष्मी, शांतादुर्गा परिवारातील देवदेवता प्रतिष्ठापना आणि शास्त्रोक्त नित्य पूजा आणि प्रासंगिक उत्सव (सर्व मूर्ती आपल्याकडे आहेत.)
२. परिसरातील गरजूंना शिक्षणासाठी यथायोग्य मदत
३. लगतच्या परिसरातील सामाजिक कार्याला हातभार (इथे बराचसा मागास भाग आहे)

### सहकार्यासाठी विनंती

श्रींच्या कृपेने जिल्हाधिकारी स्तरापर्यंतच्या सर्व परवानग्या मिळाल्या असून काही दिवसातच बांधकाम सुरू होणार आहे. संस्थानाच्या सभासदांनी आणि दानशूर व्यक्तींच्या सहभागाने जमीन खरेदी, इमारतीचा आराखडा इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत. आपल्या मदतीने बांधकाम लवकर पूर्णत्वास जाईल म्हणून सढळ हस्ताने या उपक्रमाला मदत करावी ही विनंती!

**श्री मंगेश, श्री महालक्ष्मी आणि श्री शान्तादुर्गा देवतेचा आशीर्वाद आपणा सर्वांस प्राप्त होवो.**

**Payments can be facilitated through either of the following methods :**

1) By Issuing cheque payable to "Shri Mangirish Pratishthan Dharmic Nyas", or
2) By making deposit in the following account :
   **Bank name :** SVC Co-Op Bank Ltd.
   **Branch :** Vileparle West Branch
   **A/c No. :** 105903130000533
   **Account type :** (Saving, Current or OD)
   **IFS code :** SVCB0000059

Kindly circulate this among your relatives and friends for contributing towards a worthy cause.
Shree Mangirish Nyas will gratefully acknowledge your help.

Thanking you,
**Dr. Uday Nabar** (Trustee)
(Shri Mangirish Pratishthan Dharmic Nyas)
98216 29301

**श्री मांगिरीश प्रतिष्ठान धार्मिक न्यास आपल्या सहकार्याबद्दल नेहमीच कृतज्ञ राहील.**

# 2023 Innovator Award Winner : Ashwini Bedekar

**Ashwini Bedekar, Ph.D.**
Research Scientist, University of Illinois Urbana Champaign

For her research contributions to environmental biotechnology and bioprocess engineering. Specifically, for her research on the biological conversion of methane through the use of methane-eating bacteria to mitigate climate change and utilize waste gases.




Dr. Ashwini Bedekar is a dedicated environmental biotechnologist with a Ph.D. in Biotechnology from India.

With over 8 years of experience, she has developed innovative technologies to address environmental challenges, focusing on issues like global warming and water

pollution. Her passion for environmental issues has driven her academic pursuits, leading to prestigious fellowships from renowned institutions such as the Department of Biotechnology, University Grant Commission, and the Department of Science and Technology, India.

After relocating to the USA and pursuing a post-doctoral fellowship at the University of Illinois at Urbana-Champaign, Ashwini has become a committed research scientist. Her current focus lies in the biological conversion of methane, a potent greenhouse gas, using methane-eating bacteria known as methanotrophs. Her primary goal is to transform methane gas into valuable chemicals, contributing significantly to environmental sustainability.

Ashwini attributes her professional achievements to the unwavering support of family. In her free time, she finds joy in the simple pleasures of life, engaging in playful activities and sharing delightful moments with her 2 years old son. Long walks with her family in nature bring her solace and connection, providing a perfect balance to her busy professional life. Ashwini's dedication, passion, and family support continue to drive her impactful contributions to the field of environmental biotechnology.

## ब्रेक्स

एकदा फिजिक्सच्या टीचरने मुलांना प्रश्न विचारला,

कारमध्ये ब्रेक्स का लावलेले असतात? त्यावर निरनिराळी उत्तरे आली.

'थांबण्यासाठी'

'वेग कमी करण्यासाठी'

परंतु सर्वांत चांगले उत्तर होते

'जास्त वेगाने जाता येण्यासाठी'

असे कसे? जरा विचार करा.

जर तुमच्या कारमध्ये ब्रेक्सच नसते तर तुम्ही जास्तीत जास्त किती वेगाने गाडी चालवाल?

कारण कारला ब्रेक आहेत म्हणूनच तुम्ही वेगाने गाडी चालवण्याचे धाडस करू शकता. तुमच्या इच्छित स्थळी पोहोचू शकता.

जीवनातही तुम्हाला आई, वडील, सासू, सासरे, कुटुंब इ. रूपात ब्रेक्स मिळतात. ते तुम्हाला वेळोवेळी टोकतात, अडवतात. शंका-कुशंका उभ्या करतात. तुमच्या मार्गात अडथळे आणण्याचे काम करतात. असे अनेक लोक तुम्हाला चीड आणतात.

परंतु लक्षात ठेवा, जीवनात वेळोवेळी आलेल्या अशाब्रेक्समुळेच तुम्ही आहे ते स्थान मिळवू शकला आहात. असे ब्रेक्स नसते तर तुम्ही कुठेतरी भरकटला असता. अपघातात किंवा संकटात सापडला असता.

म्हणूनच जीवनात अधूनमधून येणाऱ्या अशा ब्रेक्सची जाण ठेवा.

# डॉ. उल्हास तेंडुलकर ह्यांना जीवनगौरव पुरस्कार

गोरेगाव येथील प्रसिद्ध ‘अंबा लॅब’चे मालक डॉ. उल्हास तेंडुलकर यांना वैद्यकीय व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल ‘कुडाळ देशस्थ आद्य गौड ब्राह्मण युवक मंडळ’ या संस्थेचा मानाचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दि. २८ जानेवारी २०२४ रोजी हा समारंभ मातृमंदिर, गोरेगाव येथे श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

डॉ. उल्हास तेंडुलकर हे सारस्वत चैतन्यचे आधारस्तंभ देणगीदार असून सारस्वत हितवर्धक मंडळाचे गेली अनेक वर्षे विश्वस्त आहेत. या मंडळातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या वैद्यकीय शिबिरे व अन्य समाजोपयोगी उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.



## सुविचार

- महान चित्रकार चित्रात चेहरा आणि मन दोन्ही चितारतो.
- वाद घालणारी व्यक्ती सज्जन असू शकत नाही.
- खूप बुद्धी असली तरी थोड्याश्या धैर्याच्या अभावामुळे ती वाया गेल्याची उदाहरणे या जगात भरपूर सापडतात.
- हसून जो आयुष्य जगतो तो दांभिक असतो.
- नावलौकिक म्हणजे गाजावाजा. जेवढा जास्त गाजावाजा करावा तेवढा तो दूरवर ऐकू जातो.
- हिऱ्याला घासल्याशिवाय चकाकी येत नाही, त्याचप्रमाणे जीवनातल्या संकटांशिवाय माणूस परिपक्व होत नाही.


YASHAM

YASHAM SPECIALITY INGREDIENTS PVT LTD

Industries Catered



PERSONAL CARE

FOOD AND NUTRACEUTICALS

VETERINARY

CONSTRUCTION

PHARMACEUTICAL

BEYOND CHEMICALS BUILDING PARTNERSHIP

YASHAM SPECIALITY INGREDIENTS PVT LTD

401, Satya Dev, Plot No A-6, Veera Industrial Estate, Off Veera Desai Road, Andheri (W), Mumbai - 400 053

**Tel.:** 91-22-4063 9900, **Fax:** 91-22-4063 9901, **Email :** yasham@yasham.in, **Website :** www.yasham.in

***We encourage your research & help sourcing your new requirements***

# ज्येष्ठ पत्रकार विजय साखळकर यांची मनाला चटका लावणारी एक्झिट

**- प्रमोद तेंडुलकर**

ज्येष्ठ पत्रकार विजय साखळकर यांच्या दुःखद निधनाचे वृत्त ऐकून मनस्वी दुःख झाले आणि क्षणात विजयच्या सहवासातील अनेक आठवणी जाग्या झाल्या. विजयला मी 'राजू' या नावानेच संबोधत असे. नवोदित लेखक विजय ते ज्येष्ठ पत्रकार, कादंबरीकार विजय साखळकर असा त्याचा पत्रकार व लेखन प्रवास मी पाहिला आहे. विजय सतत लेखनात कार्यमग्न असायचा. त्याने आयुष्यभर लेखनावर उपजीविका केली. माझ्या संपादनाखाली दहा-बारा वर्षे सारस्वत चैतन्य त्रैमासिक व संस्कारदीप दिवाळी अंक प्रकाशित व्हायचे. त्या काळात दरवर्षी दोन्ही दिवाळी अंकात त्याची कथा असायची. गेल्या वर्षीपर्यंत हे सुरू होते. मानधनाची तो कधीच कोणाकडे मागणी करत नसे. पण या त्याच्या चांगुलपणाचा मी गैरफायदा घेतला नाही. त्याला दिवाळी अंक प्रकाशित होण्यापूर्वीच मानधन देत असे. वेळेवर लेखन पाठविणे व जे कोणी स्वच्छेने मानधन देतील ते स्वीकारणे, हा त्याचा स्वभाव होता. कुणी मानधन दिले नाही, तरी त्याविषयी तो कधीच बोलत नसे. त्याच्या अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. तो उत्तम अनुवादक होता. बऱ्याचदा त्याची अनेकांशी भेट मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात किंवा वसंत विलास हॉटेलमध्ये व्हायची. मीही त्यातील एक. कथा, कादंबरी लेखनाबरोबर क्राईम रिपोर्टिंग हा त्याचा आवडीचा विषय होता. श्री साप्ताहिक, दै. नवनगर, मुंबई राजधानी, सा. सह्याद्री अशा काही नियतकालिकांमधून त्याने पूर्ण वेळ पत्रकारिता केली. अनेक पत्रकार, साहित्यिक यांच्याशी त्याचे घनिष्ठ संबंध होते. गेले वर्षभर तो अंथरुणाला खिळून होता. काही महिने दहिसर येथील हॉस्पिटलमध्ये



त्याच्यावर उपचार सुरू होते. नंतर त्याला घरी नेण्यात आले आणि पुन्हा वांद्रे येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र दिनांक २७ जानेवारी २०२४ रोजी वांद्रे येथील हॉस्पिटलमध्येच त्याने अखेरचा श्वास घेतला. आजारी असताना मी त्याच्या घरी व रुग्णालयातही जाऊन त्याची विचारपूस केली. श्रद्धा वहिनींना फोन करून धीर देण्याचा प्रयत्न करत राहिलो. राजू अंथरुणाला खिळल्यापासून श्रद्धा वहिनींनी बाकीची सर्व कामे बाजूला ठेवून २४ तास पतीची सेवा करण्याचे कर्तव्य बजावण्यात धन्यता मानली.

व्रत समजून पत्रकारिता व लेखन करणारा सेवाभावी वृत्तीचा माझा पत्रकार मित्र हरपला. त्याची एक्झिट मनाला चटका लावून गेली. तो गेला तेव्हा मी मुंबईबाहेर होतो. त्यामुळे त्याच्या अंत्यविधीसाठी उपस्थित राहता आले नाही. ही खरी खंत माझ्या मनात कायम राहील. ईश्वर त्याच्या आत्म्यास शांती देवो. ओम शांती!

**- लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.**

## भावांजली

**ज्येष्ठ पत्रकार विजय साखळकर यांचे निधन**


मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी सदस्य, नवनगर दैनिकाचे माजी संपादक, गुन्हेगारी जगताचे वार्तांकन करणारे जेष्ठ पत्रकार विजय साखळकर यांचे २७ जानेवारी २०२४ रोजी निधन झाले. निधन समयी ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन बहिणी, मेहुणे, चुलत भाऊ असा परिवार आहे. विजय साखळकर यांनी अनेक वर्तमानपत्रांतून, विविध दिवाळी अंकांसाठी विपुल प्रमाणात लिखाण केले होते. गुन्हेगारी विश्वाची अंदरकी बात सांगणारी सदरेही त्यांनी लिहिली.



**शुभांगी श्रीरंग शेणवी अग्नी :**
पैंगीण-काणकोण येथील रहिवासी सौ. शुभांगी श्रीरंग शेणवी अग्नी, वय वर्षे ८२, यांचे गुरुवार २५ जानेवारी २०२४ रोजी रात्री राहत्या घरी निधन झाले. त्या श्रीरंग अग्नी यांच्या पत्नी, सागर व शुभांगी अग्नी यांच्या मातोश्री /सासू, तसेच स्वाती/नितांत प्रभू खोलकर यांच्या मातोश्री/सासू होत्या.

# कर्म आणि चारित्र्य

**- अशोक नाडकर्णी**



कर्म हा शब्द संस्कृतातील 'कृ' या धातूपासून तयार झालेला आहे. 'कृ' म्हणजे करणे. म्हणजे जे काही आपल्या हातून केले जाते, ते सारेच 'कर्म' होय. जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत मनुष्य काही ना काही कर्म करतच असतो. मानवाकडून आयुष्यात चांगली किंवा वाईट कर्मे घडत असतात. त्या कर्मांप्रमाणे त्याला चांगले किंवा वाईट भोग भोगावे लागतात. येथे एक लक्षात ठेवावयास हवे. ते म्हणजे, चांगल्या कर्मामधून वाईट कर्मे वजा होत नाहीत. तुम्ही चांगली कर्मे भोगा आणि वाईटही भोगत राहा. तेव्हा मानवाने विचारपूर्वक चांगल्या कर्मांचा पाठपुरावा करावा, म्हणजे आयुष्य सुंदर होते. तसे पाहिले तर 'इच्छाशक्ती' ही चारित्र्यातून निर्माण होत असते आणि चारित्र्य हे कर्माने घडविले जात असते. म्हणून मनुष्याने आपले चारित्र्य शुद्ध ठेवले पाहिजे. नेहमी सकारात्मक आणि चांगले विचार मनात आणले पाहिजेत. आपण आपला नेहमीच विचार करत असतो; पण दुसऱ्याचा विचार करून त्याला मदतीचा हात देण्यात जे समाधान आहे, त्याला जगात तोड नाही. आयुष्य जगताना जीवनात चढ-उतार येणारच व आपल्या कर्मांनुसार सुख किंवा दुःख हे भोगावेच लागणार असते. अंधार आहे म्हणूनच तर सूर्याची किंमत कळते. चांगल्या विचारांचा पाठपुरावा केला आणि तसे वागले तर त्या कर्मांची चांगलीच फळे तत्काळ किंवा विलंबाने प्राप्त होतात. नुसती सुखाची अपेक्षा करून सुख मिळतेच असे नाही. सुख म्हणजे नेमके काय असते, तर जे आपल्याला आवडते, ते मिळवणे म्हणजे 'सुख'. पण जे मिळते, ते आवडणे म्हणजे 'समाधान' होय. यामध्ये गल्लत करू नये. समाधान झाले की सुख हे नेहमी आपोआप मिळत जाते. म्हणूनच मानवाने कर्म करताना चारित्र्य शुद्ध ठेवले पाहिजे. म्हणजे मानवी जीवन हे सुंदर व सुखी होते.

# वाचकांना व वर्गणीदारांना आवाहन, आश्रयदाते-आधारस्तंभ व्हा!

'सारस्वत चैतन्य' त्रैमासिकास आता ३८ वर्षे पूर्ण झाली आहेत. दर अंकागणिक सारस्वत चैतन्यचे स्वरूप अधिकाधिक आकर्षक करण्याचा संपादक मंडळाचा प्रयत्न राहिला आहे. सारस्वत चैतन्य त्रैमासिक व अन्य उपक्रम यासाठी निधीची आवश्यकता आहे. म्हणून आम्ही सर्व विद्यमान वर्गणीदार व देणगीदारांना आपली प्रतवाढ करण्याचे आवाहन करीत आहोत. आश्रयदाते आधारस्तंभ व्हा आणि संस्थेची आर्थिक बाजू बळकट करा. तसेच शुभेच्छा किंवा स्मृतिप्रीत्यर्थ देणगी पाठवून संस्थेच्या कार्यास हातभार लावावा. आश्रयदाते व आधारस्तंभ यांची नावे दर अंकात छापण्यात येतात. (अधिक माहितीसाठी वर्गणी-देणगी फॉर्म निवेदन पाहावे.) आमच्या पूर्वीच्या आवाहनाला अनेकांनी मनापासून पाठिंबा दिला आहे. त्याबद्दल देणगीदारांना धन्यवाद. या आवाहनालाही आपण असाच उत्स्फूर्त प्रतिसाद द्याल, अशी खात्री आहे. देणगीदारांची नावे खाली प्रसिद्ध करीत आहोत. यानंतरची नावे पुढील अंकात छापण्यात येतील. सर्व देणगीदारांचे आभारी आहोत.

**- विश्वस्त मंडळ, सारस्वत प्रकाशन विश्वस्त संस्था**

**आधारस्तंभ (व्यक्ती)**

१. अद्वैत नीलेश हुन्सवाडकर, दादर, मुंबई : रु. १०,०००/-
२. त्रिंबक मंगेश नाडकर्णी, गोवा : रु. १०,०००/-

**आधारस्तंभ कुटुंब**

१. डॉ. उल्हास रामचंद्र तेंडुलकर, दादर, मुंबई : रु. २०,०००/-
(कै. रामचंद्र यशवंत (Ry) तेंडुलकर व कै. सुधा रामचंद्र तेंडुलकर यांच्या स्मरणार्थ)
२. सौ. धनश्री सुबोध नेमळेकर, मुंबई : रु. २०,०००/-
(कै. कवी द. वि. तेंडुलकर ऊर्फ प्रफुल्लदत्त यांच्या स्मरणार्थ)
३. श्रीमती सुनीता रमाकांत कुलकर्णी, मुंबई : रु. २०,०००/-
(कै. श्री रामकांत शिवराम कुलकर्णी (मसुरेकर) यांच्या स्मरणार्थ)

**आश्रयदाते (व्यक्ती)**

१. रेखा सचिन कुंकळ्ळीकर, गोवा : रु. ६,०००/-
२. पृथा सचिन कुंकळ्ळीकर, गोवा : रु. ६,०००/-
३. श्री. विठ्ठलदास पुंडलिक भट, गोवा : रु. ६,०००/-

**हितचिंतक**

१. श्री. अशोक सावळाराम सिनकर, डोंबिवली : रु. ३,५००/-
२. सौ. गीता रवी बागाव, कल्याण : रु. ३,५००/-
३. सुप्रसाद बाबूराव नाईक (गावकर), : रु. ३,५००/-

# सारस्वत प्रकाशन

**देणगीदार फॉर्म**

(Reg. No. under Bombay Public Trust Act 1950 - E-13364)
१०, सारस्वत भवन, छत्रपती शिवाजी महाराज पथ, (मोगल लेन), माहीम, मुंबई – ४०० ०१६
वेबसाईटचा पत्ता : www.saraswatprakashan.org Email : chaitanyamag@gmail.com

All Donations (Except Cash Donations above Rs. .2000/- ) are eligible for 50% exemption from Income Tax under Sec. 80G of the Income Tax Act, 1961 vide **Regn. No. AAGTS6431DF20231** dtd. 28-02-2023 of the Director of Income Tax Exemption, Mumbai **valid till 31-03-25** PAN NO. :- **AAGTS6431D**

कार्यवाह, दिनांक : _____ / _____ / 20 ___

सारस्वत प्रकाशन, मुंबई

मी / आमची संस्था / कंपनी, आपल्या सामाजिक संस्थेच्या उपक्रमासाठी देणगी देत आहे. सदर देणगीचा विनयोग संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी करण्यात यावा ही विनंती.

१. संपूर्ण नाव : ______________________________

२. घरचा पत्ता : ______________________________

______________________________

३. ई-मेल आयडी : ____________________ मोबाईल क्र.: ____________

४. जन्मतारीख : ____________________ गोत्र: ____________

५. कुलदैवत व ठिकाण : ______________________________

६. ज्ञातिघटक : ______________________________

(माहीत असल्यास – कुडाळदेशकर, भालावलीकर, बारदेशकर, शेणवी, चित्रापूर, राजापूरकर, पेडणेकर, साष्टीकर यापैकी )

७. पॅन कार्ड (आवश्यक) : ______________________________

८. देणगी रक्कम : ____________________ श्रेणी : ____________

खालील तीन पैकी कोणत्याही एका प्रकारे आपण देणगी रक्कम अदा केली आहे. .

☐ अ. UPI पेमेंट :- संस्थेचा मोबाईल क्र. **8779758085** किंवा QR कोड वापरून

☐ आ. NEFT :- IFSC कोडसह बँकेचा तपशील वापरून

☐ इ. धनादेश :- **'सारस्वत प्रकाशन'** / **SARASWAT PRAKASHAN** ह्या नावाने धनादेश काढून

Bank Account Details:
**SVC Co-operative Bank Ltd.**
Matunga Branch,
Saving Account no.
**100503130013891**
IFS code : **SVCB0000005**

आपला विश्वासू

सही

टीप : १) नको असलेला मजकूर खोडावा. २) अधिक माहितीसाठी मागील पानावर पाहावे. ३) ८०जी अंतर्गत देणगीदारांना पॅन कार्ड क्रमांक देणे आवश्यक आहे.

# सारस्वत चैतन्य


स्थापना: एप्रिल १९८६

- सकल सारस्वतांमध्ये सुसंवाद साधण्याच्या हेतूने १९८६ पासून कार्यरत संस्था
- दर्जदार सारस्वत चैतन्य त्रैमासिकाचे अव्याहत ३८ वर्षे प्रकाशन.
- मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे २००३, २००४ साली उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून पुरस्कार.
- २०१० नंदा फाऊंडेशन पुरस्कार
- १९९४ **'गौड सारस्वत परिचय'** ग्रंथ प्रकाशन.
- १९९६ मुंबईत एक दिवसाचे जी. एस. बी. संमेलन संपन्न
- २००३ 'सारस्वत भातीय संस्कृतीचे उपासक"- गो. म. लाड लिखित पुस्तकाचे प्रकाशन
- २००० सालापासून सातत्याने सारस्वत चैतन्य गौरव सोहळ्याच्या यशस्वी आयोजनातून कर्तुत्ववान सारस्वत व्यक्तींचा सन्मान

## या सामाजिक उपक्रमात देणगीदार म्हणून सहभागी व्हा व 'सारस्वत चैतन्य' त्रैमासिक तहाहयात घरपोच मिळवा.

| देणगीदार : | आधारस्तंभ | आश्रयदाता | हितचिंतक | गौरव सोहळा |
|---|---|---|---|---|
| **व्यक्ती** | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ ३,५०० | **₹ २५,०००** |
| **संस्था** | ₹ २०,००० | ₹ १२,००० | - | - |
| **कुटुंब * / स्मृत्यर्थ *** | ₹ २०,००० | ₹ १२,००० | - | - |

- एखाद्या व्यक्तीच्या स्मृतीप्रीत्यर्थ तिच्या नावाने कुटुंबीयांनी देणगी दिल्यास त्यांना **'कै. ___ यांचे कुटुंबीय'** किंवा **'सौ. व श्री. ____ आणि कुटुंबीय'** अशा नावाने **'सारस्वत चैतन्य'** त्रैमासिकाचे आधारस्तंभ / आश्रयदाते होता येईल.
- व्यक्ती या देणगीदार प्रकारातील आधारस्तंभ, आश्रयदाता यांची नावे सदरील व्यक्ती हयात असेपर्यंत अंकात छापली जातील.
- संस्था व कुटुंब (स्मृत्यर्थ ) आधारस्तंभ, आश्रयदाते या देणगीदार प्रकारातील नावे अंकात कायम स्वरूपात छापली जातील.
- सर्व देणगीदारांची नोंद एक अंकात घेतली जाईल.
- देणगीदारांना **'सारस्वत चैतन्य'** त्रैमासिकाचा अंक तहहयात पाठविला जाईल.
- याबरोबर पूर्वीच्या तहहयात वर्गणीदारांनी (₹ २००/- वा ₹ २५०/- इत्यादी दिलेल्यांनी) वरीलप्रमाणे देणगी देऊन सहकार्य करावे.
- या व्यतिरिक्त शुभेच्छा देणगी / स्मृतीप्रीत्यर्थ देणगी या अन्य कोणत्याही कार्यासाठी दिलेल्या देणगीच स्वीकार केला जाईल. सादर देणगीचा उल्लेख ज्या अंकात प्रसिद्ध केला जाईल त्याची प्रत देणगीदाराला पाठविली जाईल.


WHO GMP CERTIFIED • ISO 9001:2015 & ISO 13485:2016 CERTIFIED
ENTOD
SINCE 1977
A Speciality Pharmaceutical Wellness Company like No other
"We strive for a day when our innovations will take us beyond traditional symptomatic therapeutics. And that day, there will be no medicines; only prophylaxis, diagnosis and cure"
- Late G.V. Masurkar
Founder
Experts in Ophthalmic, ENT & Paediatric Pharmaceutical Wellness
Over 130 Commercially Available Finished Products
International Formulation R&D Centres
Scan QR Code:
Patient-Centred Innovations since 1977
ENTOD PHARMACEUTICALS LTD
Head Office: Ashirwad Building, S.V.Road, Opp. Badi Masjid, Bandra (W), Mumbai-400050.
Tel.: (+91) 22 – 26423608/ 22-226442052 Fax.: (+91) 22-26441056
E-mail: feedback@entodpharma.com • www. entodinternational.com
Part of
Entod
INTERNATIONAL




The name Dempo is bound-up with Goan history for half a millennium. The Dempos were then renowned for agriculture, trading, imports, and underwriting besides social responsibility.

Today, DEMPO moves ahead, a confident, caring conglomerate, reaping the practice of business tempered with ethics in each of their existing lines of activity, while staying wedded to their core values as they venture into planned lines of Industrial activity, new and emerging businesses. The Group firmly believes in ethical and transparent Corporate Governance which is critical to the long-term success and ability to create value for the stakeholders.

The Group is committed to creating a more sustainable enterprise. Besides business performance, the group also makes significant investments in community engagements through the implementation of various meaningful philanthropic programmes. Corporate Governance and ethical management have always been the guiding principles of carrying out the business at Dempo.


**DEMPO** **Group of Companies**

Corporate Office : Dempo House, Campal, Panaji - Goa 403 001.
Tel : 0832 - 2226281 / 862441300 / 457
Fax : 0832 - 2225098 / 2228588
E-mail : mail@dempos.com Website : www.dempos.com

Goa Carbon I Devashri Nirman - Real Estate I Dempo Shipbuilding & Modest Infrastructure I Navhind Papers & Publications & Goa 365 I Dempo Travels I Hindustan Foods I Dempo Sports Club I Dempo Charities & Education I Mahamaya Farms I Motown Trading I Mewo Co-working

## प्रसिद्ध झाले

# सारस्वत परिचय




● आडनाव, गोत्रे, ज्ञातिघटक, कुलदैवत, कुलदैवताचे स्थान यांची अद्ययावत सूची ●
● गोत्र, प्रवर, ज्ञातिघटक, कुलदैवते यांच्याविषयी संक्षिप्त माहिती ●
● मराठी व इंग्रजी भाषेत ●
● नवीन संकल्पना, आधुनिक रंगसंगती ●

**ही दर्जेदार सूची व सर्व सारस्वतांपर्यंत रुपये ३५० (कुरिअर चार्जसह) एवढ्या माफक देणगी मूल्यात घरपोच पाठवण्यात येईल. तीच प्रत संस्थेच्या कार्यालयात येऊन घेऊन जाणाऱ्यास रुपये २५० ला उपलब्ध आहे.**
**संस्थेचे बँक अकाउंट डिटेल्स व मेल आयडी खाली देत आहोत. देणगी मूल्य संस्थेच्या खालीला खात्यात भरून आपली मागणी संपूर्ण पत्ता, मोबाईल नं. व ईमेल आयडीसह नोंदवावी.**

Mail ID : chaitanyamag@gmail.com

Banking Details for Transfer of Money
SARASWAT PRAKASHAN SARASWAT BANK - Mahim Branch
A/c No. : 007200103581173
IFS Code : SRCB0000007

For more details you can contact :
Shri. Rahul Sakhalkar - 8108018989 or
Saraswat Prakashan Off - 8779758085

Registrar of Newspapers, New Delhi
SARASWAT CHAITANYA
Regd. No. : 46921/87
Posted At- Mumbai Patrika Chanel
Sorting Office Mumbai - 400 001




Printed & Published by Rahul Ramkrishna Sakhalkar, for Saraswat Prakashan, Saraswat Bhavan, 2nd floor, Room no. 10, Chhatrapati Shivaji Maharaj Road ( Mogal lane), Mahim ( West), Mumbai -400016 Printed at New Rajkamal Printing Press, 305 Retiwala Industrial Estate H. A. Palav Road, Byculla (East), Mumbai -400027
Editor - Sudhakar Vasant Lotlikar ●year 38 ●Issue 4 ● January-March 2024 ●Pages 60 ●Price 20 Rupees